दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

मराठा आरक्षणासाठी १५ फेब्रुवारीला विधानसभेचं विशेष अधिवेशन

नगर : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुबंईच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने सर्व मागण्या मान्य करत अधिसूचना काढत मराठा आरक्षण देण्यासंदर्भात ठोस आश्वासन दिलं होतं. आता मराठा आरक्षणासाठी १५ फेब्रुवारीला विधानसभेचं विशेष अधिवेशन घेण्यात येणार आहे. अधिवेशनात मागासवर्ग आयोगाचा अहवाल मांडला जाणार आहे. नव्याने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे कायदा बनवला जाण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशनात विधेयक मांडलं जाण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणासाठी येत्या १० फेब्रुवारीपासून मनोज जरांगे पुन्हा आमरण उपोषणाला बसले आहेत. मराठा आरक्षणाचा कायदा पारित करावा, म्हणून आमरण उपोषण आहे.

* (आष्टी) वर्धा * रविवार दि. ११/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २३ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

घोसाळकरांची हत्या सुपारी देऊन?



उद्धव ठाकरेंनी उपस्थित केली शंका

राज्यात खुलेआम गुंडगिरी

मुंबई : अभिषेक घोसाळकर यांच्यावर मॉरिस यानेच गोळ्या चालवल्या की आणखी कुणी? त्या दोघांनाही मारण्याची सुपारी दुसऱ्या कुणी दिली होती का, अशी शंका उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेतून व्यक्त केली. त्यातच अभिषेक घोसाळकर यांचा शवविच्छेदन अहवालही समोर आला असून घोसाळकर यांच्या शरीरात चार गोळ्या घुसल्याचे स्पष्ट झाले आहे.

ठाकरे म्हणाले, राज्यातील कायदा-सुव्यवस्था ढासळली आहे. घोसाळकर यांच्या हत्येचे प्रकरण जेवढे दिसतेय तेवढे सोपे नाही. सूडभावनेतून माणूस अत्यंत टोकाचं पाऊल उचलतो. त्याने हत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलले असेल तर आत्महत्या का केली, हा प्रश्न राहतो. गोळ्या कोण झाडत आहे, हे कळत नाही. मॉरिसकडे परवानाधारक शस्त्र नव्हते. त्याने त्याचा बॉडीगार्ड मिश्राचे शस्त्र वापरले. त्याने बॉडीगार्ड का ठेवला? त्याच्यावर ती वेळ का आली? असे प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, "महाराष्ट्रातील पोलिसांवर दबाव आहे. गेले दीड वर्षे राज्यात गुंडगिरी सुरू आहे. खुलेआम हत्या होत आहेत. सुपारी देऊन मॉरिस आणि घोसाळकरांची हत्या करण्यात आली का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. पोलिसांवर जनतेला विश्वास राहिलेला नाही."

राज्याचे गृहमंत्री मनोरुग्ण

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केलेल्या वक्तव्याचा समाजार घेताना ठाकरे म्हणाले, ''राज्याला मनोरुग्ण गृहमंत्री लाभला आहे. सरकार पोलिसांच्या नाहीतर गुंडांच्या पाठीशी उभे आहे. सरकार गुंडांच्या मागे उभे राहिले तर असेच राज्यात घडेल. देवेंद्र फडणवीस यांना मी कलंक, फडतूस म्हटले आहे. हे शब्द खूप सौम्य आहेत. त्यांना निर्घृण म्हणावे लागेल. आपल्या राज्याला एक मनोरुग्ण गृहमंत्री लाभला की काय? असा संताप उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

कर्मचाऱ्यांना ८.२५ टक्के व्याज मिळणार

ईपीएफओची घोषणा

नवी दिल्ली : कामगार भविष्य निर्वाह निधीने (ईपीएफओ) २०२३-२४ मध्ये ८.२५ टक्के व्याजदराची घोषणा केली आहे. हा दर गेल्या तीन वर्षांतील सर्वाधिक आहे. मार्च २०२३ मध्ये कर्मचारी भविष्य निधीत सरकारने २०२२-२३ च्या व्याजासाठी ८.१५ टक्के व्याज निश्चित केले होते, तर २०२१-२२ मध्ये ८.१० टक्के व्याज निश्चित केले होते. केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या बैठकीत शनिवारी हा निर्णय झाला. मार्च २०२२ मध्ये ईपीएफओने २०२१-२२ साठी व्याजदर ८.१ टक्के केला होता. गेल्या चार दशकांतील हा सर्वात कमी व्याजदर होता. ईपीएफओबाबत निर्णय घेणारी संस्था सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीज (सीबीटी) ने शनिवारी झालेल्या बैठकीत कर्मचारी भविष्य निधीसाठी २०२३-२४ मध्ये व्याजदर ८.२५ टक्के करण्याचा निर्णय घेतला.



मोटरमनची गांधीगिरी; प्रवाशांना मनस्ताप

अतिरिक्त कामास नकार दिल्याने १०० लोकल खोळंबल्या

मुंबई : मोटरमन मुरलीधर शर्मा यांच्या लोकल अपघातातील मृत्यूनंतर मोटरमननी अचानक काम करण्यास नकार देत शनिवारी गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले. त्यामुळे मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावरील रेल्वे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. मोटरमन नसल्याने मुख्य आणि हार्बर मार्गावरील ८४ लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या, तर १०० लोकल खोळंबल्या. दुपारी अडीच वाजल्यापासून हा गोंधळ सुरू असल्याचे ▶▶ संमिश्र पानावर

प्रवासी संतापले : प्रवाशांच्याही संतप्त प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. रेल्वे कर्मचारी उद्धटपणे वागत असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. गेल्या दीड-दोन तासांपासून लोकल सेवा बंद आहे. मध्य आणि हार्बर लाईनवर जाणाऱ्या लोकल फलाटाला लावून ठेवल्या आहेत. उद्घोषणा बंद आहे. यामुळे लोकल कोणत्या कारणासाठी रखडल्या आहेत याची माहिती प्रवाशांना कळत नव्हती. दुपारी अडीच वाजेपासून हा गोंधळ सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. रात्रीपर्यंत आणखी लोकल रद्द होण्याची शक्यता वर्तवण्यात आली. लोकल रद्द झाल्याने प्रवासी संतापले आहेत. आरपीएफही प्रवाशांना समजवण्याचा प्रयत्न करत आहेत. गाडी अनाऊन्स करायला पाहिजे. गाडी लेट आहे, हे कोण सांगणार आहे? असा सवाल प्रवाशांकडून होत आहे. आम्ही अर्ध्या तासापासून स्टेशनमध्ये उभे आहोत. आम्हाला घरी जायचं आहे, कोण सांगणार? असा संताप प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

निवडक

मिथुन चक्रवर्ती रुग्णालयात दाखल

कोलकाता : ज्येष्ठ चित्रपट अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना छातीत तीव्र वेदना होत असल्याच्या तक्रारीनंतर शनिवारी यांना कोलकाता येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चक्रवर्ती यांचा एमआरआय करण्यात आला आणि सध्या इतर चाचण्या केल्या जात आहेत, असे ते म्हणाले. संबंधित आरोग्य सेवा अधिकाऱ्यांनी सांगितले. चक्रवर्ती यांना शनिवारी स. १०.३० वाजता दाखल करण्यात आले आहे.

जेएनयूत हाणामारी

नवी दिल्ली : जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका घेण्याबाबत झालेल्या बैठकीत हाणामारी झाली. दोन्ही बाजूंनी यांचे काही सदस्य जखमी झाल्याचा दावा केला. भांडण करणाऱ्या गटांनी गोंधळासाठी समोरच्या बाजूस दोष दिला, परंतु जेएनयू प्रशासनाकडून त्वरित प्रतिक्रिया आली नाही. या संघर्षात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि डाव्या विचारसरणीच्या मोक्रॅटिक स्टुडंट्स फेडरेशन या दोन्ही बाजूंमध्ये संघर्ष झाला. २०२४ च्या जेएनयूच्या विद्यार्थी संघटनेच्या निवडणुकीसाठी कॅम्पसमधील साबरमती ढाब्यावर निव्हर्सिटी जनरल बॉडी मीटिंग दरम्यान विद्यार्थी गटांमध्ये ही हाणामारी झाली.

मॉरिसचा अंगरक्षक मिश्रावर हत्येचा गुन्हा

मेघा कुचिक/मुंबई : अभिषेक घोसाळकर हत्याप्रकरणी मॉरिस याचा अंगरक्षक अमरेंद्र मिश्रा याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. महानगर दंडाधिकारी न्यायालयाने मिश्रा याची १३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली.

पोलिसांनी सांगितले की, या गुन्ह्यात मिश्रा याचा सहभाग असल्याने त्याला अटक केली आहे. घोसाळकर यांच्या हत्येसाठी वापरलेले पिस्तूल मिश्रा यांच्या मालकीचे होते. हे पिस्तूल बाळगण्यामागे काय हेतू होते, याचा तपास केला जात आहे. हेच पिस्तूल नोरोन्हा याने आत्महत्येसाठी वापरले होते, हे पोलिसांनी नमूद केले आहे. मॉरिसकडे पिस्तूल ठेवण्याचा परवाना होता का, याची मिश्रा यांनी पडताळणी ▶▶ संमिश्र पानावर

महाराष्ट्रात गुंडाराज; खर्गे यांचा आरोप

नवी दिल्ली : महाराष्ट्रात शनिवारी घडलेल्या घटनांवरून भाजपवर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी जोरदार हल्लाबोल केला. यात महाराष्ट्रात नुकतीच फेसबुक लाईव्ह दरम्यान एका शिवसेना नेत्याची अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून झालेली हत्या आणि निखिल वागळे यांच्या गाडीवर झालेला हल्ला याचा संदर्भ देत खर्गे यांनी महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था कोसळली आणि गुंडाराज पसरवला जात असल्याचा आरोप केला.

भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी २ फेब्रुवारी रोजी मुंबईजवळील उल्हासनगर येथे जमिनीच्या वादातून आणि राजकीय वैमनस्यातून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या स्थानिक नेत्यावर गोळ्या झाडून जखमी केले होते.



एक्सवरील हिंदीतील एका पोस्टमध्ये, खर्गे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेली कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. भाजपने जनादेश चोरला आहे. तेथे फेसबुक लाईव्हवर एका राजकारण्याची निर्घृण हत्या केली जाते. भाजप- ▶▶ संमिश्र पानावर

समीर वानखेडे यांच्याविरोधात 'ईडी'कडून गुन्हा दाखल

धर्मेश ठक्कर/मुंबई : वरिष्ठ आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्याविरोधात 'ईडी'ने गुन्हा दाखल केला. यापूर्वी अमली पदार्थविरोधी पथक (एनसीबी) व सीबीआयने गुन्हे दाखल केले आहेत.



यापूर्वी मंगळवारी दिल्ली पटियाला हाऊस कोर्टाने वानखेडे यांनी आयपीएस अधिकारी ज्ञानेश्वर सिंह यांच्याविरुद्ध छळ केल्याप्रकरणी दाखल केलेल्या तक्रारीबाबत पोलिसांकडून कारवाईचा अहवाल मागवला. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणाऱ्या ज्ञानेश्वर सिंह यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी करणाऱ्या वानखेडेंच्या ▶▶ संमिश्र पानावर

वानखेडे उच्च न्यायालयात

कार्डेलिया क्रूझ अमली पदार्थ प्रकरणात ईडीने दाखल केलेला मनी लाँड्रिंगचा गुन्हा रद्द करण्यासाठी वानखेडे यांनी बॉम्बे हायकोर्टात धाव घेतली. वकील करण जैन यांच्यामार्फत हायकोर्टात त्यांनी याचिका दाखल केली. वानखेडे यांच्याविरोधात दाखल केलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी वानखेडे यांच्या वकिलांनी केली.

पाकिस्तानमध्ये त्रिशंकू अवस्था

इस्लामाबाद : पाकिस्तानमध्ये गुरुवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे बहुसंख्य निकाल हाती आले असून त्यात कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे देशहितासाठी सर्व पक्षांनी एकत्र येऊन संयुक्त सरकार स्थापन करावे, असा सल्ला लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी दिला आहे. विशेष म्हणजे नवाझ शरीफ यांनी शुक्रवारी याच आशयाचे विधान केले होते.

संयुक्त सरकार स्थापनेचा लष्करप्रमुखांचा सल्ला

पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीच्या २६५ जागांसाठी गुरुवारी मतदान झाले. शुक्रवार आणि शनिवारी झालेल्या मतमोजणीनंतर त्यापैकी २५५ जागांचे निकाल पाकिस्तान निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आले. त्यानुसार इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ (पीटीय) या पक्षाचे ▶▶ संमिश्र पानावर

आपही इंडिया आघाडीतून बाहेर?

पंजाबमधील सर्व जागा लढणार -केजरीवाल



नवी दिल्ली : इंडिया आघाडीतून राष्ट्रीय लोक दल बाहेर पडल्यानंतर शनिवारी दुसऱ्याच दिवशी आम आदमी पार्टी आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत मिळत आहेत. पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी पंजाबमधील सर्व लोकसभा जागा आप लढवणार असून राज्यातील १३ उमेदवारांची यादी लवकरच जाहीर करणार असल्याचे केजरीवाल यांनी जाहीर केले.

अरविंद केजरीवाल म्हणाले, "मी आज पुन्हा एकदा सर्व जनतेसमोर हात जोडून आशीर्वाद मागतो. दोन महिन्यांनी होणारी लोकसभा निवडणूक आम्ही लढवणार आहोत. पंजाबमधील सर्व १३ जागा आणि चंदिगडमधील एका जागेवर आम्ही आमचा उमेदवार जाहीर करणार आहोत. येत्या १० ते १५ दिवसांत आम्ही आमच्या सर्व १४ उमेदवारांची यादी जाहीर करू. मी सर्व जनतेला विनंती करेन की, ज्याप्रकारे तुम्ही दोन वर्षांपूर्वी मला आणि आमच्या आम आदमी पार्टीला आशीर्वाद दिला, तसाच आशीर्वाद यावेळी पुन्हा एकदा द्या."

इंडिया आघाडी बनवण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वीच इंडिया आघाडीला रामराम करत भाजपशी घरोबा ▶▶ संमिश्र पानावर

महायुतीतही अनेक जागांवरून मतभेद

रायगडमध्ये तटकरे-भाजप नेते आमनेसामने

विशेष प्रतिनिधी/मुंबई

एकीकडे महाविकास आघाडीचे चर्चेचे गुऱ्हाळ सुरू आहे. मात्र, दुसरीकडे महायुतीतही जागावाटपावरून धुसफूस सुरूच आहे. एकीकडे महायुतीचे नेते कामाला लागलेले आहेत. परंतु या दरम्यान मतभेदही चव्हाट्यावर येत आहेत. रायगडची जागा तर हिटलिस्टवर आहे. एक तर रायगडचे विद्यमान खासदार सुनील तटकरे यांना शिंदे गटाचे आव्हान आहे. मात्र, दुसरीकडे भाजपनेही या जागेवर दावा ठोकला आहे. त्यामुळे तटकरे यांची चांगलीच गोची झाली आहे. यासोबतच इतरत्रही बऱ्याच जागांवर वाद होण्याची चिन्हे आहेत.

रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीची ताकद जशी मोठी आहे, तशीच शिवसेना शिंदे गट आणि भाजपची ताकद आहे. त्यामुळे जिल्ह्यात कुरघोडीचे राजकारण होण्याची शक्यता वाढली आहे. खा. सुनील तटकरे यांना शिंदे गटाचा आधीच विरोध आहे. विशेषतः मंत्री अदिती तटकरे यांना रायगडचे पालक मंत्रीपद देऊ नये, यासाठी शिंदे गटाच्या आमदारांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. आता लोकसभा निवडणुकीच्या पुढे थेट भाजपनेच तटकरेंसमोर आव्हान उभे केले आहे. स्थानिक भाजप नेत्यांनी रायगडवरून कडेलोट करून आम्ही आगामी लोकसभा जिंकू, असे आव्हानच भाजप नेत्यांनी खा. तटकरे यांना दिले.

त्यामुळे जिल्ह्यात अजित पवार गटाचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना विरोध वाढला आहे. त्यामुळे तटकरे यांची आगामी काळात कोंडी होण्याची शक्यता आहे. यातून मार्ग काढण्यासाठी ते प्रयत्नशील असून, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा दाखला देऊन आपली वाट मोकळी करू पाहात आहेत. मात्र, स्थानिक नेत्यांचा विरोध आगामी लोकसभा निवडणुकीत तटकरे यांच्या अंगाशी येण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञ बोलून दाखवत आहेत.



शहा, फडणवीस तटकरेंना तारणार?

भाजपच्या स्थानिक नेत्यांच्या प्रखर विरोधामुळे खा. सुनील तटकरे यांची चांगलीच गोची झाली आहे. त्यामुळे तटकरे यांनी शनिवारी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राज्याचे भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नावे सांगत एक प्रकारे स्थानिक भाजप नेत्यांना धमकी दिली आहे. जिल्ह्यातील काही स्थानिक भाजप नेते माझ्या विरोधात बोलत आहेत. परंतु याची दखल भाजपच्या वरिष्ठांकडून घेतली जाईल, असे तटकरे म्हणाले. त्यामुळे हा वाद ऐन निवडणुकीत चिघळू शकतो.

सुनील तटकरे हे रायगडचे विद्यमान खासदार आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत त्यांनाच उमेदवारी मिळेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्यासमोर ठाकरे गटाचे अनंत गीते पुन्हा मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे या दोघांमध्येच पुन्हा लढत रंगण्याची चिन्हे आहेत. अनंत गीते यांनी पुन्हा मोर्चेबांधणी केली आहे. मात्र, शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडल्याने त्याचा फटका त्यांना बसू शकतो, असे बोलले जात आहे. मात्र, त्यांच्यापेक्षा तटकरे यांच्यासमोर मोठे आव्हान उभे ठाकण्याची शक्यता आहे. कारण एक तर शिंदे गटाचा खा. सुनील तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे यांना विरोध आहे. दुसरीकडे भाजपचे स्थानिक नेतेही त्यांना विरोध करीत आहेत. त्यामुळे ही अंतर्गत धुसफूस तटकरे यांना चांगलीच महागात पडू शकते, असे बोलले जात आहे.

सरासरी तापमानात १.५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढ

जागतिक तापमानवाढ नियंत्रणाबाहेर

लंडन : जागतिक सरासरी तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसच्या खाली राखण्यात अनेक वर्षांनंतर २०२३ साली अपयश आले आहे. यावर्षी जगाचे सरासरी तापमान नियोजित १.५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढले. फेब्रुवारी २०२३ ते जानेवारी २०२४ या काळात पृथ्वीचे सरासरी तापमान १.५२ अंश सेल्सिअसने वाढल्याची माहिती युरोपीयन युनियनच्या (ईयू) कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिसने दिली आहे.

सुमारे १०० ते १५० वर्षांपूर्वीपर्यंत अनेक युगांतके पृथ्वीचे सरासरी तापमान फारसे वाढले नव्हते. औद्योगिक क्रांतीनंतर या परिस्थितीत वेगाने बदल होत गेला. पर्यावरणातील मानवी हस्तक्षेप, प्रदूषण, जंगलतोड, हरितगृह वायूंचे उत्सर्जन आदी कारणांमुळे गेल्या काही वर्षांत पृथ्वीचे सरासरी तापमान बरेच वाढले आहे. सन १८५० ते १९०० या वर्षांमध्ये जागतिक सरासरी तापमानवाढ अर्धा अंश सेल्सिअसपेक्षा कमी होती. ते प्रमाण १९४० ते १९८० दरम्यान अर्धा अंश सेल्सिअसपर्यंत आले. १९८० ते २००० या काळात दरवर्षी पृथ्वीचे सरासरी तापमान साधारण एक अंश सेल्सिअसने वाढत गेले. त्यानंतर हा वेग ▶▶ संमिश्र पानावर



अधिक तापमानवाढीला 'अल-निनो'चा हातभार

पर्यावरणातील मानवी हस्तक्षेप आणि जीवाष्म इंधनांचे ज्वलन ही जागतिक तापमानवाढीची महत्त्वाची कारणे होती. पण २०२३ साली त्यात हवामानाच्या 'अल-निनो' परिणामानेही हातभार लावला. सन २०२३ च्या मध्यापासून अल-निनो परिणाम प्रभावी होण्यास सुरुवात झाली आणि सध्याही त्याचा प्रभाव वाढत आहे. मात्र, अल-निनोमुळे जागतिक सरासरी तापमानवाढ फार तर ०.२ अंश सेल्सिअसपर्यंत होऊ शकते. बाकीच्या तापमानवाढीला मानवी हस्तक्षेप जबाबदार आहे.

संपादकीय .....

भारतरत्नांची खैरात!

भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून दिला जाणारा पुरस्कार आहे, त्यामुळे जसे इतर पद्मश्री पुरस्कार जास्त प्रमाणात जाहीर होतात, त्या तुलनेत भारतरत्न पुरस्कार होत नाहीत. त्याचे प्रमाण अगदी मोजके असते. काही वर्षे अशीही गेली आहेत की, त्यावर्षी भारतरत्न पुरस्कार जाहीर झालेला नाही. हा पुरस्कार एखाद्या व्यक्तीला निश्चित करताना पुरस्कार समितीकडून अनेक निकष लावले जातात, त्यातून पुरस्काराची निश्चिती केली जाते. काही वेळा तर विशिष्ट नेत्याला भारतरत्न देण्यात यावे, अशी मागणी केली जाते, तरीही ते सहजासहजी दिले जात नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा जोतिबा फुले यांना भारतरत्न देण्याची मागणी महाराष्ट्रातून होत आहे, पण त्याची केंद्र सरकार दखल घेताना दिसत नाही. हिंदुत्ववादी मानले जाणारे सरकार बहुमतात केंद्रात आल्यानंतरही सावरकरांना भारतरत्न दिले जात नाही, याविषयी आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर केंद्रातील मोदी सरकारकडून पंधरा दिवसांच्या अवधीत चक्क ५ जणांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झाले. त्यामुळे आश्चर्यच नव्हे तर अनेकांकडून शंका व्यक्त केली जात आहे. काही दिवसांपूर्वी बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि त्या राज्यातील ओबीसींचे मोठे नेते दिवंगत कर्पुरी ठाकूर आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यापाठोपाठ आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी भारताचे दोन माजी पंतप्रधान दिवंगत चौधरी चरण सिंह आणि पी. व्ही. नरसिंह राव, तसेच भारतातील कृषीक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर केले. भारतरत्न पुरस्कार इतक्या मोठ्या प्रमाणात कसे काय जाहीर झाले, असा प्रश्न पडणे सहाजिकच आहे. काँग्रेसच्या राजवटीत त्यांनी ज्या मान्यवरांच्या योगदानाची उपेक्षा केली, त्यांना सन्मानीत करण्याचा या मागे हेतू आहे की, काँग्रेसवर सरशी मिळवण्यासाठी हे पुरस्कार देण्यात आले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावर जे आभार प्रदर्शनाचे भाषण केले, त्यातील बहुतांश भाग हा काँग्रेसवर टीका करणारा होता. अगदी पंडित नेहरूंनी भारतीयांना आळशी आणि कमकुवत म्हटले होते. इतकेच नव्हे, तर नेहरू कसे आरक्षणाचे विरोधक होते, असे अनेक मुद्दे भरभरून उगाळण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी विरोधक आहेत, असा प्रचार राहुल गांधी यांनी त्यांच्या न्याय यात्रेत सुरू केला. ओबीसींची देशात मोठी संख्या आहे. त्याचसोबत बिहारसारख्या मोठ्या राज्यात भाजपला सत्ता मिळवायची आहे. त्यामुळे बिहारमधील नितीश कुमार आणि लालू प्रसाद यादव यांची कोंडी करणे आवश्यक होते. बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर बिहारमधील राजकीय परिस्थिती बदलली.

मोदींच्या विरोधात देशातील विरोधकांची इंडिया आघाडी उभारून पहिली बैठक पाटणामध्ये घेणारे नितीश कुमार इंडिया आघाडीला पोरके करून भाजपच्या पंगतीला येऊन बसले. भारतरत्न पुरस्कारामुळे झालेले हे परिवर्तन मोदींनी पाहिले. लालकृष्ण अडवाणी यांना मानणारा एक वर्ग भाजपमध्ये आहे. कारण राम मंदिरासाठी रथयात्रा काढून देशात हिंदुत्वाची लाट अडवाणी यांनी निर्माण केली होती. त्यामुळेच पुढे बाबरी मशिदीचे पतन झाले. त्यानंतर लोकसभेत भाजपच्या दोन खासदारांचे दोनशे खासदार झाले. त्यातून भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सरकार केंद्रात सत्तेत आले, पण नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर अडवाणी यांच्यासोबत ज्येष्ठ नेत्यांना बाजूला करण्यात आले होते. त्यामुळे मोदींविषयी नाराजी होती. अडवाणींना भारतरत्न जाहीर करून मोदींनी ती नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला, असे मानण्यास वाव आहे.

राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर पी. व्ही. नरसिंह राव यांनी खर्या अर्थाने काँग्रेसला सावरले. कारण त्यावेळी सोनिया गांधी नवख्या होत्या. ज्या नरसिंह राव यांनी गांधी घराणे आणि काँग्रेससाठी बुद्धी आणि शक्ती पणाला लावली, त्यांची गरज संपल्यावर काँग्रेसने पार उपेक्षा केली होती. सगळ्या पंतप्रधानांच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कार दिल्लीत केले जातात आणि त्यांची समाधी दिल्लीत बांधली जाते, पण काँग्रेसने नरसिंह राव यांच्याबाबतीत तसे होऊ दिले नाही. त्यामुळे ज्यांनी काँग्रेससाठी स्वत:ला समर्पित केले, त्यांचे काँग्रेसने काय केले, असा प्रश्न आहे. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग हे शेतकरी नेते होते, विशेष म्हणजे आणीबाणीच्या काळात त्यांनी इंदिरा गांधी यांच्या विरोधात झुंज दिली होती. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीविरोधात लढून आम्ही या देशातील लोकशाही वाचवली, असे भाजपचे नेते ठासून सांगतात. ते देशाचे दुसरे स्वातंत्र्य युद्ध होते. त्यामुळे जे आणीबाणीच्या विरोधात होते, त्यांना आपल्या बाजूला वळवण्याचा भाजपचा प्रयत्न असावा. भारतामध्ये जेव्हा अन्नाचा दुष्काळ पडला होता, तेव्हा कृषीशास्त्रज्ञ डॉ. स्वामीनाथन यांनी धान्याच्या नव्या जाती निर्माण करून अन्नधान्याच्या बाबतीत देशाला सक्षम केले, पण इतकी वर्षे झाली तरी त्यांची दखल घेतली गेली नव्हती. लोकसभा निवडणूक तोंडावर आलेली आहे, मोदींचे लक्ष आता चारसो पारचे आहे, त्यामुळे त्यासाठी जे शक्य आहे, ते सगळे करताना दिसत आहेत. त्यातूनच ही भारतरत्नांची खैरात तर होत नाहीना, असे वाटण्यास बराच वाव आहे.

वकील-इ-मुतालिक- मुख्य कारभारी !

(महादजी शिंदे स्मृतिदिन विशेष.)

महादजी शिंदे यांचा मूळ पिंड लढवय्या वीराचा असला, तरी ते राजकारणातही वाकबगार होते. युद्धप्रसंगी केव्हा लढावे? केव्हा माघार घ्यावी? याचे उत्तम ज्ञान त्यास होते. आपले लष्कर त्यांनी फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मदतीने सुसज्ज केले आणि शस्त्रास्त्रे तयार करून घेतली. दिल्लीवर कब्जा, राजस्थानात वर्चस्व व उत्तर हिदुस्थानात दरारा ही त्याची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची आहे. त्यांच्या पावन स्मृती जागविण्यास श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख अवश्य वाचा... संपादक.

महादजींना अपत्य नव्हते. अखेर त्यांनी आपल्या जहागिरीच्या व्यवस्थेसाठी आपल्या भावाचा नातू दौलतराव याची निवड केली होती. त्यांचा मूळ पिंड लढवय्या वीराचा असला, तरी ते राजकारणातही वाकबगार होते. युद्धप्रसंगी केव्हा लढावे? केव्हा माघार घ्यावी? याचे उत्तम ज्ञान त्यास होते. आपले लष्कर त्यांनी फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मदतीने सुसज्ज केले आणि शस्त्रास्त्रे तयार करून घेतली. दिल्लीवर कब्जा, राजस्थानात वर्चस्व व उत्तर हिदुस्थानात दरारा ही त्याची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची आहे. महादजींना हिंदू तथा मुस्लीम साधुसंतांविषयी आदर होता. बीडच्या मन्सूरशाह वली या मुस्लीम साधूवर त्यांची विशेष भक्ती होती. याशिवाय सोहिरोबानाथ आंबिये, लक्ष्मण महाराज रामदासी, शिरगावकर, मल्लप्पा, रासकर, दत्तनाथ राक्षसभुवनकर आदी साधुसंतांवर त्यांची श्रद्धा होती. त्यांना हिंदी, उर्दू, संस्कृत, फारसी या भाषा अवगत होत्या. महादजी मराठी व हिंदी भाषांत कविता करीत असत. त्यांची कृष्णभक्तीवरील कवने उपलब्ध आहेत. ते कीर्तन करताना ती म्हणत असत. त्यांनी गीतेवर टीका लिहिली होती. परंतु ती उपलब्ध नाही. त्यांच्या आश्रयास सुखदेव वैद्य, बालमुकुंद मिश्र, सविता, सुरती मिश्र यांसारखे वैद्य, कवी तसेच गवई, तमासगीर, चित्रकार व पखवाजी होते. महादजींनी उज्जैन, गोकुळ, वृंदावन, पुष्कर आदी ठिकाणी बांधकामे केली. राहत्या जांबगावास माधवनगर हे नाव देऊन तेथे महाल बांधला. महादजी कडक शिस्तीचे आणि अत्यंत स्वाभिमानी होते. गुलाम कादर, कारस्थानी इस्माईल बेग यांस त्यांनी फाशीची शिक्षा दिली, तर ज्याने होळकरांविरुद्ध कारस्थान केले तो गोपाळराव व आनंदराव नरसिंग यांना त्यांच्या अपराधाबद्दल शिक्षा ठोठावल्या.

महादजी शिंदे म्हणजे उत्तर पेशवाईतील एक पराक्रमी सेनानी आणि मराठा साम्राज्याचे मुत्सद्दी होते. पहिल्या बाजीराव पेशव्याचा विश्वासू सरदार राणोजी यास चिमाबाई या राजपूत स्त्रीपासून झालेला हा मुलगा होय. महादजींचा जन्म दि.३ डिसेंबर १७३० रोजी पुणे येथे झाला. शिंद्यांचे मूळ घराणे सातारा जिल्ह्यातील कण्हेरेखेड ता. कोरेगाव या गावचे होते. राणोजी व जयाप्पा यांच्या माळव्यातील व उत्तरेकडील इतर मोहिमांतून महादजींना शिपाईगिरीचे शिक्षण मिळाले. त्यांनी प्रथम तळेगाव-उंबरीच्या निजामावरील लढाईत पराक्रम करून नाव मिळविले. त्यांनी औरंगाबाद येथे सन १७५१, साखरखेडले येथे सन १७५६, पंजाब येथे सन १७५९ इत्यादी सालच्या मोहिमांतही त्यांनी भाग घेतला. पानिपतच्या तिसऱ्या लढाईत एका पठाणाने केलेल्या आघातामुळे ते लंगडे झाले. तेव्हा राणेखान नावाच्या एका मुसलमान भिस्त्याने त्यांना मदत केली. महादजींनी त्यास भाऊ मानून पुढे सरदार केले. थोरल्या माधवरावांच्या कारकिर्दीत राघोबाच्या नादी लागून पटवर्धन प्रतिनिधी यांच्याप्रमाणेच निजामाला जाऊन मिळण्याच्या बेतात ते होते. गोहदच्या जाटांविरुद्ध राघोबाच्या नेतृत्वाखाली ते लढले. थोरल्या माधवरावांनी त्यांना सन १७६८मध्ये सरदारकी दिली. मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर त्यांची दौलत खालसा करावी, म्हणून राघोबा प्रयत्नशील होता. तेव्हा महादजींनी अहिल्याबाईस मातोश्री मानून सर्वतोपरी सहकार्य देण्याचे ठरविले. पेशव्यांनी त्यांना पानिपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी बिनीवाले व कानडे यांबरोबर दिल्लीकडे रवाना केले. तेथे महादजींनी नजीबखानाचा रोहिलखंड प्रांत लुटून ताब्यात घेतला आणि शाह आलम बादशहास इंग्रजांच्या तावडीतून सोडवून दिल्लीच्या तख्तावर बसविले. त्यामुळे पेशव्यांस उत्तरेत मराठ्यांचा जम बसविण्यास महादजींचे मोठे साहाय्य झाले. राजस्थानात उदयपूरच्या तंट्यात त्यांनी साठ लाख खंडणीसह प्रांत मिळविला आणि आपला सुभेदार तेथे नेमला.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर बाराभाईचे कारस्थान उद्भवले. कोणत्या पक्षास मिळावे? याविषयी महादजींचा निश्चय प्रथम झाला नाही, परंतु नाना फडणीस व सखारामबापू यांनी त्यास मुलूख वगैरे देऊन आपल्या पक्षाकडे घेतले आणि राघोबाचा बंदोबस्त केला. तोतयाचे बंड महादजींनी मोडले. कोल्हापूरच्या छत्रपतींनी पेशव्यांचा मुलूख घेऊन कारस्थाने आरंभिली, तेव्हा महादजींनी त्यांना धडा शिकविला आणि यापुढे राघोबा व हैदर यांच्याशी संबंध ठेवणार नाही, असा करार करून घेतला. नाना फडणीसांचा चुलत भाऊ मोरोबा फडणीस याने राघोबा, इंग्रज व तुकोजी होळकर यांच्या मदतीने बंड केले आणि तीन महिने पुण्याचा कारभार हाती घेतला. तेव्हा महादजींनी मुत्सद्दीगिरीने होळकर व सखारामबापू यांना त्यातून फोडले. त्यांनी इंग्रजांना चुचकारून बंड मोडून काढले. इंग्रजांच्या कवायती सेनेची शिस्त पाहून त्याने डि.बॉइन या फ्रेंच सेनाधिकाऱ्यास आपल्या पदरी ठेवले व शिस्तबद्ध फौज तयार केली. त्यांच्या पदरी तीस हजार कवायती पायदळ, पाचशे तोफा व तीस हजार घोडदळ एवढे सुसज्ज सैन्य होते. ते मुख्यत्वे ग्वाल्हेर आणि राजधानी उज्जैन येथे होती. त्यात मराठ्यांपेक्षा मुसलमान, राजपूत व युरोपीय यांचा भरणा जास्त होता. त्याने तोफा ओतण्याचा कारखाना आग्र्यात काढून हत्यारे तयार करण्यास उत्तेजन दिले. दिल्लीच्या बादशाहीवरील मराठ्यांचे वर्चस्व कमी झाले असताना या कवायती फौजेच्या जोरावर ते पुन्हा प्रस्थापित केले. त्यासाठी दिल्लीतील मुसलमान सरदारांच्या सन १७८४मधील भांडणाचा फायदा घेऊन बादशहास ताब्यात घेतले. बादशहाकडून वकील-इ-मुतालिक- मुख्य कारभारी ही पदवी मिळविली. स्वत:स नायबगिरी मिळवून बादशहास ६५ हजारी नेमणुका करून सर्व अधिकार आपल्या हाती घेतले. शिवाय बादशहाकडून गोवध बंदीचे फर्मान काढविले. महादजी मथुरेस राहू लागले. त्यांच्या वाढत्या सत्तेस शह देण्यासाठी मुसलमान सरदार व काही राजपूत राजे यांनी त्याविरुद्ध बंडाळी माजविली. लालसोटच्या लढाईत बादशहाची सर्व फौज राजपुतांना मिळाली. त्यावेळी महादजींना माघार घ्यावी लागली. इस्माईल बेग, गुलाम कादर वगैरेंनी दिल्ली, अलीगढ वगैरे ठाणी काबीज करून महादजींना चंबळ नदीच्या पलीकडे रेटले. या सुमारास गुलाम कादरने शाह आलमचे डोळे काढून त्याच्या जनानखान्याची बेअब्रू केली. त्यावेळी महादजींनी ताठर भूमिका सोडून पुणे दरबारची म्हणजे नाना फडणीसांची मदत मागितली. सन १७८८साली नानांनी अली बहादरास त्यांच्या मदतीला पाठविले. त्यांनी शीख-जाट यांना मदतीस घेऊन गुलाम कादर व त्याचे सहकारी मुस्लीम सरदार आणि उदेपूर, जोधपूर, जयपूर आदी राजपूत राजे यांचा पराभव केला दिल्ली पुन्हा हस्तगत केली. राजस्थानवर आपले वर्चस्व स्थापित केले. हतबल शाह आलम यास पुन्हा दिल्लीच्या तख्तावर बसविले आणि गुलाम कादरखान व बेग यांस देहान्त शासन केले. त्यानंतर पातशाही कारभार महादजींनी आपल्या हाती घेतला. अशाप्रकारे त्यांनी आपल्या पराक्रमाने व कर्तृत्वाने सतलजपासून तुंगभद्रापर्यंत मराठी साम्राज्याच्या सीमा भिडविल्या. असा उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेचा दरारा निर्माण केला.

उत्तर हिदुस्थानात सुमारे बारा वर्षे राहून तेथे सर्व स्थिरस्थावर झाल्यावर महादजी जून १७९२ मध्ये पुण्यास आले. सवाई माधवरावांनी त्यांचा यथोचित मानसन्मान केला. सुमारे पावणेदोन वर्षे ते पुण्यात स्वस्थच होते. अखेर एकाएकी नवज्वर होऊन पुण्याजवळील वानवडी येथे दि.१२ फेब्रुवारी १७९४ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांची स्मृतिछत्री वानवडीस उभारली आहे. !! त्यांच्या अचाट कार्यकर्तृत्वाला स्मृतिदिनी मानाचा मुजरा !!

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.
इमेल- nikodekishnakuma@gmail.com

पान १ वरून

लोकसभेआधी सीएए लागू

पाकिस्तानमधील निर्वासितांना नागरिकत्व देण्यासाठी केलेला कायदा आहे,'' असे शहा म्हणाले.

या कायद्याने कोणाला संरक्षण मिळणार आहे, हे स्पष्ट करताना शहा म्हणाले, "३१ डिसेंबर २०१४ च्या आधी पाकिस्तान आणि बांगलादेशमधून भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चनांसह छळ झालेल्या गैर मुस्लीम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देणे, हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे.'' डिसेंबर २०१९ मध्ये संसदेने सीएए कायदा मंजूर केला. त्यानंतर देशभरात या कायद्याविरोधात निषेध नोंदवला गेला. हा कायदा रद्द व्हावा याकरिता निदर्शने करण्यात आली.

राज्य सरकार बरखास्त करा!

महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने राज्यपाल रमेश बैस यांची राजभवनात जाऊन भेट घेतली आणि या मागण्यांचे निवेदन राज्यपालांना देण्यात आले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री नसिम खान, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, चंद्रकांत हंडोरे, अतुल लोंढे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. राज्यपालांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, राज्यात थेट पोलिस स्टेशनमध्ये गोळीबार, हल्ले होत आहेत. दिवसाढवळ्या खून केले जात आहेत. तसेच सत्ताधाऱ्यांचेच लोक कायदा हातात घेऊन मनमानी करून लोकशाहीत आवाज दाबत आहेत. राज्यात मागच्या काही दिवसांतील स्थिती पाहता कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे. याबाबत अपयशी ठरलेल्या राज्य सरकारला बरखास्त करावे, अशी मागणी आम्ही राज्यपालांकडे केली आहे.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्याने विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, सध्या येथे गुंडांचे राज्य सुरू झाले आहे. रोज उठून कुणी तरी धमकी देत आहे आणि हल्लेही होत आहेत. तसेच सत्ताधा-यांशी संबंधित मंडळीच कायदा हातात घेऊन धुडगूस घालत आहेत. त्यामुळे राज्यात सलोखा, शांतेतेचे वातावरण कायम ठेवण्यात राज्य सरकार अपयशी ठरले आहे. या पार्श्वभूमीवर आता थेट राज्यपालांची भेट घेऊन महायुतीचे सरकार बरखास्त करण्याची मागणी करण्यात आली.

सरकारच्या आश्रयाने
राज्यात गुंडगिरी : ठाकरे

राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पुरती ढासळली असून, राज्य सरकारच्या आश्रयाने गुंडगिरी सुरू आहे. त्यातच गुंडांना मिळणारे संरक्षण चिंतेचा विषय बनत चालला असून, यामुळे राज्यातील जनता दुखावली आहे. आमचा युवा कार्यकर्ता अभिषेक याची हत्या झाली. त्याच्यावर हल्ला करणारा गुंड त्याने आत्महत्या केली. भाजपच्या आमदाराने पोलिस स्टेशनमध्ये जाऊन गोळीबार केला. पुण्यात भाजपच्या लोकांनी धुडगूस घातला. त्यामुळे राज्यातील सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करावी आणि निवडणुका घ्याव्यात, असे माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले.

महाराष्ट्रात गुंडाराज; खर्गे यांचा आरोप

आरएसएसच्या बेलगाम गुंडांकडून एका स्पष्टवक्त्या पत्रकारावर हल्ला केला जात आहे, तर भाजपचा एक आमदार पोलीस ठाण्यात उघडपणे दुसऱ्या राजकारण्यावर गोळ्या झाडत आहे.

खर्गे म्हणाले की, काँग्रेसने नेहमीच महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राखली आणि तरच राज्याचा आर्थिक विकास शक्य झाला. पण सक्त अंमलबजावणी संचालनालयाच्या बळावर स्थापन झालेले भाजप सरकार 'गुंडाराज' पसरवून महाराष्ट्रातील जनतेच्या सुरक्षेशी खेळत आहे.

मोटरमन्सची गांधीगिरी; प्रवाशांना मनस्ताप

सांगण्यात येत आहे.

मध्य रेल्वेचे मोटरमन मुरलीधर शर्मा यांनी रेल्वे सिग्नल ओलांडल्यामुळे त्यांची रेल्वे प्रशासनाकडून चौकशी सुरू होती. त्यातच सँडहर्स्ट रोड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसदरम्यान रेल्वे अपघातात त्यांचा शुक्रवारी मृत्यू झाला. शर्मा यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. मात्र, त्यांचे नातेवाईक येणार असल्याने अंत्यसंस्काराची वेळ सायंकाळी ५ वाजता ठेवण्यात आली. शर्मा यांच्या अंत्यसंस्काराचे कारण देत मुख्य आणि हार्बर मार्गावरील शेकडो मोटरमननी अतिरिक्त काम करण्यास नकार दिला.

आपही इंडिया आघाडीतून बाहेर?

केला आहे. दुसऱ्या बाजूला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनीदेखील पश्चिम बंगालमध्ये 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. त्यामुळे आता केजरीवालही आघाडीतून बाहेर पडले तर आघाडीची उत्तर भारतातील ताकद कमी होऊ शकते.

समीर वानखेडे यांच्याविरोधात 'ईडी'कडून गुन्हा दाखल

याचिकेवर न्यायालयाने दिल्ली पोलिसांना नोटीस बजावली.

अभिनेता शाहरूख खान याचा मुलगा आर्यन खानला अमली पदार्थ खटल्यातून सोडवण्यासाठी २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ईडीने गुन्हा नोंदवला. यापूर्वी या प्रकरणात सीबीआयने गुन्हा नोंदवला आहे.

ईडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, समीर वानखेडे व अन्य तीन एनसीबीच्या अधिकाऱ्यांविरोधात मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला असून त्यांची चौकशी केली जाईल.

ईडीने नोंदवलेला गुन्हा हा सीबीआयच्या गुन्ह्यावर अवलंबून आहे. त्याची बॉम्बे हायकोर्टात सुनावणी आहे. हे प्रकरण न्यायालयात असल्याने मी याबाबत काहीही वक्तव्य करणार नाही. मी कोर्टात योग्य वेळी योग्य तो खुलासा करीन. भारतीय न्यायव्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास आहे, असे वानखेडे म्हणाले.

२ ऑक्टोबर २०२१ मध्ये कार्डेलिया क्रूझमध्ये एनसीबीने छापे मारले होते. त्यात आर्यन खानविरोधात गुन्हा दाखल करून २० जणांना अटक केली होती.सीबीआयने वानखेडे यांच्याविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले.

जागतिक तापमानवाढ नियंत्रणाबाहेर

जवळपास दीड अंश सेल्सिअसपर्यंत वाढू लागला.

ही परिस्थिती अशीच कायम राहिली तर भविष्यात पृथ्वीवरील वातावरण मानवी वस्तीसाठी पोषक राहणार नाही, ही बाब जगभरच्या शास्त्रज्ञांच्या लक्षात आली. त्यानंतर २०१५ साली पॅरिस येथे झालेल्या जागतिक हवामान बदलविषयक परिषदेत असे ठरले की, पृथ्वीची वार्षिक सरासरी तापमानवाढ दीड अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवण्याचे प्रयत्न करावेत. त्यानुसार जगभर वेगवेगळे प्रयत्न करण्यात आले. त्यांना यश येऊन गेल्या काही वर्षांत हे उद्दिष्ट गाठण्यात येत होते. मात्र, २०२३ साली त्यात खंड पडला. गतवर्षी पृथ्वीचे सरासरी तापमान दीड अंश सेल्सिअसपेक्षा अधिक दराने वाढले. पर्यावरणरक्षणाच्या भविष्यासाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे.

मॉरिसचा अंगरक्षक मिश्रावर हत्येचा गुन्हा

केली होती का, याचा तपास पोलीस करत आहेत.

मिश्रा यांचे वकील शंभू झा म्हणाले की, अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येच्या कटप्रकरणी मिश्रा हा संशयित असल्याचा आरोप पोलीस करत आहेत. त्याच्याविरोधात कलम ३०२ लागू होऊ शकत नाही. मात्र, पोलीस या गुन्ह्यात त्याला अडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण त्याने पिस्तुल उत्तर प्रदेशातून मुंबईत आणले होते. मिश्रा हा पोलिसांना तपासात सहकार्य करत आहे. तरीही पोलिसांनी त्याची कोठडी घेतली आहे, असे ते म्हणाले.

पोलिसांनी दावा केला की, मिश्रा हा चौकशीत सहकार्य करत नसून उत्तरे टाळत आहे. मिश्रा याने हे पिस्तुल कधी मुंबईत आणले, याचा शोध पोलिस घेत आहेत. त्याने मुंबई पोलिसांकडून परवानगी घेतली होती का? त्या मुंबईत यापूर्वी पिस्तुल वापरले होते का? याचा तपास केला जात आहे. मॉरिस याला पिस्तुल देताना मिश्रा याला काही आर्थिक लाभ झाला होता का? त्याची गुन्हेगाराची काही पार्श्वभूमी होती का? याचा शोध पोलीस घेत आहेत.

मिश्रा यांच्या वकिलाने सांगितले की, मिश्रा याचा गुन्हा किरकोळ आहे. तो गुन्हेगार नाही. त्याच्याकडे पिस्तुल वापराचा संपूर्ण देशाचा परवाना आहे. मिश्रा हा नोकर होता. तो कायमच बंदुक सुरक्षितपणे ठेवत होता. या घटनेच्या वेळी मॉरिसने मिश्रा याच्या परवानगीशिवाय वापरली, असा दावा त्याच्या वकिलाने केला. सुनावणीनंतर कोर्टातून बाहेर पडताना मिश्रा म्हणाला की, माझ्यावर अन्याय झाला आहे. मला फसवले गेले आहे.

सागर कन्या..

सागर कन्या जणूं
सळाळती ती लाट
लाडकी सागरपुत्री
केवढा तिचा थाट

तिच्याचं मुळे कळे
रत्नाकर रुपविराट
पाहूनि चंद्र सूर्यास
बनते किती सैराट

उसळते उत्साहाने
वादळी होई सुसाट
चिडखोर असेभारी
क्रुद्धत्वे थय थयाट

कधीमोहकलाघवी
मनोहारी दिसे घाट
फेसाळत्या शुभ्रतेत
विजेचा लखलखाट

पौर्णिमेची रात्र येता
प्रेमात पडतात भाट
स्वागता सूर्या सज्ज
होता आनंदी पहाट

संतप्त स्वरुप घेता
हृदयात धड धडाट
प्रतिध्वनीगुंजलेला
गाजतो कडकडाट

कधी संथपणे चाले
रुसवा दावी मुकाट
शांत रुप का नावडे
पर्यटनी शुक शुकाट

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.
www.kavyakusum.com

२

नांदा सुखे ..

दूध साय तूप लोणी
असणार तिथे बोके
हातून सुटली सत्ता
वाजवत बसा बाके

इथून तिथून पहावे
सत्तेचे सगळेचं भुके
कुणी भलते बोलके
कुणी मौनीबा मुके

दुस-याचे पाहे वाके
आपले कोंबडे झाके
कायदा करतो वांदा
चिखलात रूते चाके

असे झाले तसे केले
कसे बिनधास्तठोके
रस्ता आहे अवघड
खायचे टोणपे टक्के

दूध मख्खन मिळेना
वरती बांधले शिंके
मिळणारं कधीखाते
माशी ऐनवेळी शिंके

सुटून कसे रे पळाले
बंदिस्त असता नाके
वास ना आला कुणा
नाके आहे का भोके

जळून चालले ओले
तसेचं पडलेत सुके
दिले घरी आता तरी
नांद सौख्यभरे सुखे

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..
www.kavyakusum.com

नागार्जुना अभियांत्रीकी व व्यवस्थापन महाविदयालया अंतर्गत महारोजगार मेळावा : अनेक बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्या सुमारे १५०० जणांना रोजगाराचे वाटप करणार.

नागपूर, दिलीप येवले-अमरावती रोडवरील सातनवरी गावाजवळ स्थित मैत्रेय शैक्षणिक संस्थे द्वारा संचलित नागार्जुना इन्स्टीटयूट ऑफ इंजिनिअरींग टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट ह्या महाविदयालयात दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी इंजिनिअरींग, मॅनेजमेंट, सायंस, कॉमर्स, एमसीए हया शाखांमधून पदविका, पदवी, पदव्युत्तर उमेदवार व आयटीआय कोर्स पूर्ण केलेल्यांसाठी तसेच अभियांत्रीकी व व्यवस्थापन शास्वातील पदविका व पदवी च्या अंतिम वर्षात शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष इंजि. मदन माटे यांच्या हस्ते व सचिव श्री. अजय वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सदर संस्थेमार्फत सामाजीक बांधीलकीच्या दृष्टीने ना नफा ना तोटा या तत्वावर अभियांत्रीकी व व्यवस्थापन शास्त्राचे शिक्षण घेणा-या ग्रामीण, दुर्गम व आदिवासी प्रदेशातील गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले जातात. त्यामधे निवासाची व महाविद्यायालयात जाण्यायेण्याची निःशुल्क सेवा, मोफत पुस्तक पेढी, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, व्यक्तीमत्व विकास वर्ग, एमपीएससी व युपीएससी परीक्षाची तयारी तसेच बारावित शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी मोफत एमएचसीईटी व जेईई चे वर्ग घेतले जातात, तसेच सर्व गुणवंत, होतकरु व गरीब विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात विशेष सुट दिली जाते. विदर्भ व महाराष्ट्रातील ग्रामीण परीक्षेत्रातिल अनेक शिक्षित विद्यार्थी बेरोजगार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांचे आयुष्य सुंदर व उज्वल करण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी अनेक रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता ह्या एक दिवसीय उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दुर्गम , आदिवासी भागातील, तळागाळातील गोरगरीब तसेच होतकरू विद्यार्थ्यांना मोठमोठ्या महानगरात नोकरी शोधतांना अनेक अडचणी येतात त्या दुर सारून एकाच ठिकाणी एकाच वेळी अनेक कंपन्या उपलब्ध करून देणे हा महाविद्यालयाचा मुख्य उद्देश आहे. सध्याच्या स्थितीत शिक्षित युवकांमधे बेरोजगारीची समस्या भेडसावणारी असून हया समस्येचे निराकरण करण्याच्या उददेशाने संस्थेने महारोजगार मेळाव्याचे आयोजन केलेले आहे. हया मेळाव्यात टाटा कन्सलटन्सी, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड, जाबील इंडीया लि., मास्टरसॉफ्ट, सांकी सोल्युशन्स प्रा. लि, समृद्धी इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड व इतर ३० हून अधिक कंपन्या सहभागी होणार असून १५०० हून अधिक



उमेदवारांची निवड करणार आहेत. इच्छूक उमेदवारांनी पळशीं.ळप या लिंकवर क्लिक करुन नोंदणी करुन सकाळी ९:०० वाजता हजर राहावे. ऐनवेळी सहभागी होण्यासाठी येणा-या इच्छुक उमेदवारांसाठी महाराजबाग नागपूर येथून महाविदयालयामार्फत सकाळी ९:०० ते दुपारी ०१:०० पर्यंत निशुल्क बससेवा पुरविण्यात येणार आहे. तरी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा. असे आवाहान संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

गोदेंगाव शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी उत्तीर्ण

दै जनप्रभात
छ संभाजीनगर ग्रामीण प्रतिनिधी श्री प्रविण वाघ

सोयगाव :- राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असुन ह्या मध्ये सोयगाव तालुक्यातील गोदेंगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेचे दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा ही १७ डिसेंबर २०२३ ला छ.संभाजीनगर येथे घेण्यात आली असुन एकुण ३५ विद्यार्थी परीक्षेला बसलेले होते त्यापैकी मनोज शांताराम पठाडे,प्रीती सदाशिव राठोड हे दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे त्यांना एस.व्ही खिरे,एम.बी. पाटील,एस.एल,घुगे,एस.बी लोलपोड,श्रीमती आशा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले होते या यशाबद्दल प्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.योगेश इंगळे,सर्व सदस्य तसेच मुख्याध्यापक आर. एस.माळी,पर्यवेक्षक जी.जी. ढाकणे,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,पालक आणि विद्यार्थी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.आहे

****



माजी सभापती धम्मपाल खोब्रागडे यांच्या अंतिम यात्रेला उसळला जनसागर



काटोल/प्रशांत पवार

पंचायत समितीचे माजी सभापती तथा सदस्य धम्मपाल खोब्रागडे यांचे शुक्रवारला सायंकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले खोब्रागडे हे शेतकरी कामगार पक्षाचे कट्टर समर्थक होते त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात दुःखाची लाट पसरली होती शनिवारी त्यांचे जन्मगाव पारडसिंगा येथे अंतिम संस्कार स्थानिक स्मशानभूमीत करण्यात आले त्यांच्या निधनावर शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शोकसभेला पंचायत समितीचे सभापती संजय डांगोरे गटविकास अधिकारी श्री गरुड गणेश चन्ने शेकाप नेते राहुल देशमुख काँग्रेसचे नेते तथा काटोल विधानसभा प्रमुख प्रकाश वसु वंचित बहुजन आघाडीचे दिगंबर डोंगरे मराठी पत्रकार संघटनेचे प्रशांत पवार यांनी संबंधित केले. शोकसभेला सर्व संबोधनकर्त्यांनी धम्मपाल खोब्रागडे यांच्या त्यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला गोरगरिबांचा नेता काळाच्या पडद्या आड गेला असेच प्रसंगी जाणवले. गावकऱ्यांनी त्यांच्या पार्थिव शरीरावर पुष्पांचा वर्षाव करून पारडसिंगा गावातील नेत्याला धम्मपाल भाऊला अश्रू नयनांनीअखेरचा सलाम केला. धम्मपाल खोब्रागडे यांच्या अंतिम यात्रेला काटोल तालुक्यातील राजकीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते उपसभापती निशिकांत नागमोते माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रशेखर कोल्हे जयंत टालाटुले माजी सभापती उदय ठाकरे शेकाप नेते राहुल देशमुख नगरपरिषद सदस्य संदीप वंजारी नरखेड येथील पदाधिकारी तसेच पारडसिंगा सरपंच निलेश तिजारे समाज कार्यकर्ते जितेंद्र डांगोरे किरण डांगोरे शेषराव वरोकर विजय तिजारे माजी सरपंच सुभाष भिंगारे आदी गणमान्य व्यक्तींसह धम्मपाल भाऊंना श्रद्धांजली वाहण्यासाठी शेकडोच्या संख्येने ग्रामस्थ व त्यांच्या चाहत्यांनी हजेरी लावली.

दक्षिण नांदेड काँग्रेस तालुकाध्यक्ष पदी सुदर्शन शेंबाले यांची निवड

दै, जनप्रभात लोहा
प्रतिनिधी/ विश्वनाथ शिंदे

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा विस्तार तसेच नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती कार्यक्रम जिल्हाभरात सुरू असून पक्ष अंतर्गत खांदे पालट मध्ये नांदेड दक्षिण काँग्रेस तालुकाध्यक्षपदी हरसद येथील निष्ठावंत युवा कार्यकर्ते सुदर्शन शेंबाळे यांची निवड करण्यात आली. नांदेड येथे घेण्यात आलेल्या बैकठकीत सुदर्शन शेंबाळे यांना माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी अभिजित सपकाळ, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, नांदेड दक्षिणचे आ. मोहन अण्णा हंबर्डे, माजी महापौर अब्दुल सत्तार, माजी उपमहापौर अब्दुल गफार, लोहा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पवार, माजी जि. प. सदस्य श्रीनिवास मोरे, उपसभापती अण्णासाहेब पवार, सिडको काँग्रेसचे अध्यक्ष सतीश पाटील बस्वदे, जिल्हाध्यक्ष श्याम कोकाटे, तालुकाध्यक्ष नितीन पाटील झरिकर आदीसह बहुसंख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



समता कॉन्व्हेंट च्या शैक्षणिक सहलीने विद्यार्थ्यांमध्ये वाढवला उत्साह



काटोल/प्रशांत पवार

समता कॉन्व्हेंट कचारी सावंगा व मूर्ती येथील चाळीस विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीचा पारडशिंगा या धार्मिक स्थळी आनंद लुटून शाळाबाह्य शिक्षणात भर घातली. विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून अक्षरांची ओळख गाण्यांच्या माध्यमातून अंकांची ओळख तसेच त्यांच्या सुप्त गुणांना महत्त्व प्राप्त व्हावे त्यांच्यामध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी इत्यादी उद्देश पूर्तीसाठी कॉन्व्हेंटर्फे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते शैक्षणिक सहलीमध्ये समता कॉन्व्हेंट चे संचालक मंडळ तसेच शिक्षिका मृणाली उमप चैताली पवार कोमल गाखरे डिंपल घागरकर किशोर घागरकर शिवलाल शेंद्रे तसेच काही माता पालक सुद्धा सामील झाल्या होत्या. प्रसंगी झुक झुक गाडीत बसून झाडे मोजणे आईचे पत्र हरवल तेच मला सापडलं इत्यादी उपक्रम घेण्यात आले एकंदरीत शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह निर्माण झाल्याचे दिसून आले.

विभागीय शिकाई मार्शल आर्ट शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये आष्टी तालुक्यातील पाच विध्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

आष्टी :-क्रीडा व युवक सेवासंचालनालंय,महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा द्वारा आयोजित विभागीय शिकाई मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धा ही तालुका क्रीडा संकुल वर्धा येथे घेण्यात आली होती उपस्तित प्रमुख पाहुणे क्रीडा अधिकारी खोब्रागडे सर ,शिकाई मार्शल आर्ट असोशियशन ऑफ इंडिया चे अध्यक्ष मा.मझहर खान सर ,सचिव मा.रवींद्र गायकी सर क्रीडा स्पर्ध्येचे आयोजक श्री निलेश राऊत सर यांच्या निगराणीत ही स्पर्धा पार पडली . या स्पर्ध्ये मध्ये आष्टी तालुक्यातील पाच विध्यार्थी यशस्वी ठरले .प्रांजली रा.कौराईक ज्ञानेश्वरी ज्युनियर कॉलेज साहूर व गायत्री ना. अम्बुडारे हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय साहूर , नयन गोवर्धन नेहारे संत भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा ह्या तीन विध्यार्थ्यानि गोल्ड मेडल पटकावून राज्य स्तरावर मुंबई येथ्ये निवड झाली आहे. तसेच ,हर्ष जि.गुजर ,शास्वत रु.ठाकरे ह्.रा.वि.इ.मी.स्कूल आष्टी च्या विध्यार्थ्यांनी सिल्वर मेडल मिळवून आपल्या शाळेचे नाव उज्वल केले. यांचे अभिनंदन करण्यास मार्शल आर्ट ट्रेनिंग स्कूल ह्.रा.वि.साहूर येथ्ये मा.फॉरेस्ट रेंजर सोन्नर साहेब यांनी विध्यार्थ्यांना फुल गुच्छे देऊन हार्दिक अभिनंदन केले. तसेच तालुका क्रीडा संकुल आष्टी चे क्रीडा संयोजक श्री अमित इंगळे सर, मार्गदर्शक, श्री नितीन डोईफोडे सर,श्री अनिल मोक्कादम सर,श्री सुरेंद्र भनेरकर व कराटे प्रशिक्षक श्री निलेश घाटवाडे सर यांनी सर्व विध्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणी पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या*



मॉडेल हायस्कूल तळेगाव (श्यामजी पंत) येथे वेशभूषा गीत गायन आणि बक्षीस वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

तळेगाव सांगली पंत

दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ ला शाळेच्या प्रांगणामध्ये वेशभूषा गीत गायन आणि बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री पद्माकरजी जुमडे सर प्रमुख पाहुणे म्हणून श्री निलेश जी बंगाले पत्रकार तसेच श्री राहुलजी लाखे सामाजिक कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते या कार्यक्रमाची सुरुवात विद्येचे आद्य दैवत सरस्वती माता स्वर्गीय शिक्षण महर्षी नारायणराव काळे माजी अध्यक्ष स्वर्गीय भैय्यासाहेब काळे भारत शिक्षण व कृषी शिक्षण संस्था आर्वी तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोची पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सु नासणे मॅडम यांनी केले प्रमुख अतिथी श्री निलेश बंगाली यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व मी याच शाळेतील माजी विद्यार्थी आहे व त्यांनी त्यांच्यातर्फे शाळेला बॅडमिंटनचे पाच सेट देण्याची



घोषणा केली दुसरे प्रमुख पाहुणे श्री राहुल लाखे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व हॉलीबॉल साहित्य देण्याची घोषणा केली यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी अध्यक्ष भाषणातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुण आणि कौशल्य विकसित करण्यासाठी रिद्धी सिद्धी प्रेरणा असणे आवश्यक आहे यावर मार्गदर्शन केले सुरुवातीला वेशभूषा कार्यक्रम घेण्यात आला त्यामध्ये अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला गीत गायन स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच श्री तांबोळी सर श्री गव्हाणे सर श्री जुमडे सर श्री ठाकूर सर श्री बनसोड सर श्री काळे सर सौ होरे मॅडम सौ नासणे मॅडम सौ गाडगे मॅडम कुमारी लांबे मॅडम यांनी प्रत्येकी एक एक गीत सादर केले व शेवटी बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला प्रथम द्वितीय तृतीय प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना टिफिन डबा पाण्याची बॉटल कंपास बॉक्स आणि स्केच पेन पॉकिट इत्यादी गिफ्ट व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले सौ होरे मॅडम यांनी बक्षीस वाटप करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला माजी मुख्याध्यापक श्री खोंडे सर यांनी शाळेतून प्रथम द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस जाहीर केलेली होते त्यांचे सुद्धा वाटप करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री तायडे सर श्री गव्हाणे सर श्री काळे सर श्री तुमडाम सर सौ कडू मॅडम सौ खंडाते मॅडम तसेच श्री मोहोड बाबूजी विश्वासराव कडू ज्ञानेश्वर मडवे या सर्वांनी सहकार्य श्री तांबोळी सर व श्री तुमडाम सर सांस्कृतिक प्रमुख यांनी संपूर्ण कार्यक्रमाची धुरा सांभाळली आभार प्रदर्शन श्री बनसोड सर यांनी सर्वांची आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

कारंजा येथे महिला मंडळी तर्फे रमाई जयंती संपन्न





कारंजा प्रतिनिधी सिद्धार्थ सोमकुवर

रमाई महिला मंडळ कारंजा घा.जी.वर्धा च्या वतीने दि.७/२/०२४ रोज बुधवारला जूनी मुकबधीर शाळा,धावडी रोड येथे त्यागमुर्ती माता रमाई जयंती संपन्न झाली.

या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून वंदनीय भंते शीलाभ अकोला हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून डॉ.वंदनाताई रामटेके तसेच पाहुणे म्हणून आयु.ललिताताई मोहोड,आयु. सुनंदाताई खोब्रागडे,आयु.शिलाताई विघ्ने,आयु.करूणाताई गोडबोले,आयु. सुलोचनाताई इंगळे या उपस्थित होत्या.याप्रसंगी गीत गायन स्पर्धा, प्रश्न मंजुषा घेऊन बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयु. रेखाताई गवई यांनी व सुत्रसंचलन आयु.सिमाताई गोंडे तर आभारप्रदर्शन आयु.भुषणाताई बागडे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता रमाई महिला मंडळाच्या आयु.वनिताताई सोमकुवर, सुनिता तायडे,बबिता शेंडे ,सुकेशनी बागडे, पुष्पाताई ताजने, शुभांगी दुपारे,वंदना सोमकुवर,डेझिराणी सोनबरसे,रंजना कोसे, कविता पाटील, प्रेरणा गजभिये, पुष्पा दुपारे, सुजाता वानखेडे,उषा ढोकने,वंदना झाडे,माया पाटील, सुनंदा तोतडे या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

माता रमाईच्या माहेरी वनंदमध्ये वंदन !



सातारा/जीवन मोहिते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण घेण्यासाठी परदेशात होते. त्यावेळी मुलांचे निधन झाले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसले तरी एका कुटुंब प्रमुखाप्रमाणे जबाबदारीने काम केले होते. एवढेच नव्हे तर घरी आर्थिक अडचण असताना सुद्धा आर्थिक मदत करण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्याकडून ती न घेता गरजू गरिबाला देण्याबाबत सूचना देणारी रमाई होती. डॉ. बाबासाहेबांना वेळोवेळी ताकद व माता रामाईची स्फूर्ती सर्वांनी घ्यावी.असे प्रतिपादन एस.के.भंडारे यांनी केले.

माता रमाई यांची १२६ वी जयंती वनंद येथे माता रामाईच्या माहेरी साजरी करून उपस्थितांनी वंदन केले.तेव्हा दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व समता सैनिक दलाचे स्टाफ ऑफिसर एस. के.भंडारे मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी भा.बौ.महासभा रत्नागिरी जिल्हाध्यक्ष अनंत सावंत होते. या प्रसंगी बी.एच. गायकवाड (राष्ट्रीय सचिव), ऍड. एस. एस. वानखडे (राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख), भारतीताई शिराळ (केंद्रीय महिला विभाग सचिव), भिकाजी कांबळे (महाराष्ट्र राज्य अध्यक्ष), संस्थेच्या इतिहासातील पहिल्या श्रामणेरी तथा बौद्धाचार्या शिबिरात बसलेल्या स्वातीताई शिंदे (महाराट्र राज्य अध्यक्षा) व वैशालीताई अहिरे (मुंबई प्रदेश अध्यक्षा) दीपक धोत्रे (वनंद शाखाध्यक्ष),संतोष धोत्रे (वनंद गाव तंटामुक्ती अध्यक्ष) आदींची भाषणे झाली. यावेळी एस.के.भंडारे यांच्या हस्ते गाव शाखांना मान्यता प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. चैत्यभूमी येथे सुभेदार रामजीबाबा यांच्या स्मृती दिन व माता रमाईच्या जयंतीनिमित्त श्रामणेरी तथा बौद्धांचार्या शिबिरातील ४९ महिला भिखुनी धम्मचारिणी, केंद्रीय प्रशिक्षणमध्ये सुनंदाताई पवार, अनिल मनोहर,सुनिल बनसोडे आदी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन एन.बी. कदम यांनी केले.सुरवातीला समता सैनिक दलाच्यावतीने भिखू संघासह माता रमाईला मानवंदना दिली, ध्वजारोहण राष्ट्रीय उपाध्यक्ष व दलाचे स्टाफ ऑफिसर भंडारे यांच्या हस्ते करण्यात आले. मानवंदनाचे संचालन असिस्टंट लेफ्ट जनरल पी एस ढोबळे,मेजर शरणपाल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली लेफ्टनंट कर्नल विनिता माने यांनी केले.

प्रदेश भाजप युवा मोर्चा सचिवपदी चेतन खडसे यांची नियुक्ती



कामठी, प्रदेश भाजप युवा मोर्चा अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी रनाळा येथील भाजप कार्यकर्ते चेतन देवराव खडसे यांची प्रदेश भाजप युवा मोर्चा सचिव पदी नियुक्ती केली आहे. . चेतन खडसे यांच्या नियुक्ती बद्दल कामठी शहर भाजप कार्यालयात आमदार टेकचंद सावरकर यांचे अध्यक्षतेखाली सत्कार समारोह आयोजित करण्यात आला होता. आमदार टेकचंद सावरकर याचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन चेतन देवराव खडसे यांच्या सत्कार केला यावेळी नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान ,कामठी तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके ,कामठी शहराध्यक्ष चंद्रशेखर तुपट, प्रदेश भाजप युवा मोर्चाचे महामंत्री कपिल गायधने, पंकज वर्मा ,किशोर बेले, ब्रह्मानंद काळे, आशिष फुटाणे ,राजकिरण बर्वे, गोपाल सीरिया ,नरेशचंद्र कलसे ,सचिन घोडमारे, मंगला कारेमोरे, सुषमा राकडे उपस्थित होते चेतन खडसे यांनी आपल्या नियुक्ती बद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस , भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,आमदार टेकचंद सावरकर यांचे आभार मानले

****

महाबळा येथे तंबाखू मुक्ती अभियान

तालुका प्रतिनिधी
सेलू :- प्रशांत झाडे

तालुक्याच्या महाबळा येथील इंदिरा गांधी हायस्कूल मध्ये तंबाखू मुक्ती अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा इरुटकर होत्या.या प्रसंगी प्रामुख्याने आरोग्य सेविका सुनीता वाढवे, शिक्षिका कल्पना श्रीरामे,,प्रीती पुंड, प्रज्ञा थुल, प्रिया भोंडे आदी उपस्थित होत्या.तंबाखू सेवानाने होणारे दुष्परिणाम या विषयावर आरोग्य सेविका सुनीता वाढवे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी तंबाखुचे दुष्परिणाम या विषयावर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. तसेच गावातून प्रभातफेरी सुद्धा काढण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वीतेकारिता शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. उपस्थितांचे आभार श्रीरामे यांनी मानले.



प्रयागराज येथील समाधीस्थळी संत केजाजी महाराजांचा महानिर्वाण दिन साजरा



सेलू .:- विदर्भाची प्रतीपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र घोराड येथील संत केजाजी महाराजांचा महानिर्वाण दिन प्रयागराज येथील समाधीस्थळी भाविकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला

संत केजाजी महाराज मकरसंक्रांतीला आयोजित कुंभमेळ्याला प्रयागराज येथे गेले असता तिथे १४ जानेवारी १९०७ ला त्यांचे तिथे देह ठेवला दारागंज येथे गंगानदी तिरावर भोसले वाड्यात त्यांची समाधी आहे तिथे पुजारी असून दररोज पूजाअर्चा होते आज त्यांची ११७ वी पुण्यतिथी आहे घोराड मध्ये संत केजाजी महाराजांची पुण्यतिथी उत्साहाने साजरी केली जाते ९ फेब्रुवारीला महाराजांचा महानिर्वाण दिवशी प्रयागराज येथे येथील भाविकांनी समाधीचे दर्शन घेत महानिर्वाण दिवस साजरा केला यावेळी पुजार्याचे उपस्थितीत समाधी पुजन आरती करण्यात आली त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले यावेळी मंदीराचे पुजारी दिनकर जोशी,, दामोधर जोशी, घोराड येथील सुरेंद्र राऊत, संजय धोंगडे, राजू नारायण वरटकर ,संजय वरटकर, कवडू सुरसे, गजानन ढोले, पंकज तडस, हरिहर ढोले, संतोष तडस, दिलीप गव्हाळे, विनोद सलाम आदी उपस्थित होते

''स्वरलता'' गीत मैफलीचा कार्यक्रम साताऱ्यात रंगणार !



सातारा/जीवन मोहिते :- दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था आयोजित स्वरगंध प्रस्तुत ''स्वरलता'' लता दीदींना आदरांजली देणाऱ्या हिंदी जुन्या गाण्यांचा बहारदार कार्यक्रम दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल, शनिवार पेठ सातारा येथे रविवार दि.११ रोजी सायंकाळी ५।। वा. आयोजित केला आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून कनिष्ठ अभियंता (सातारा नगरपरिषद) सुधीर चव्हाण व पोलीस निरीक्षक शाहूपुरी पोलीस स्टेशनचे धनंजय फडतरे उपस्थित होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष जि.प.महासंघ महाराष्ट्र राज्य काका पाटील, नाट्य व्यवस्थापक बाळासाहेब कदम, पुणे शहर प्रतिनिधी म.सा.प. पुणे शिरीष चिटणीस, व्यवस्थापक विनायक भोसले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरच्या रंगारंग ''स्वरलता'' कार्यक्रमांमध्ये सुजाता दरेकर, संगीता हेंद्रे, गीतांजली पाटील, श्वेता जाधव आदी आपापली सदाबहार गीते रसिक श्रोत्यांसाठी सादर करणार आहेत. कुलदीप पवार यांची ध्वनी व्यवस्था लाभणार आहे.

जि प शाळा कोठारबन येथे हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न.

विजेत्या महिलांना पैठणी साडी वाटप...



बीड जनप्रभात
गितांजली लव्हाळे :-

वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोठारबन या ठिकाणी हळदी कुंकवाचा कार्यक्रम व माता पालक मेळावा मोठ्या प्रमाणे पार पडला या कार्यक्रमांमध्ये होम मिनिस्टर कार्यक्रम संगीत खुर्ची ब्रॅकेट बाल थ्रो फुगा फुडणे, तळ्यात मळ्यात असे विविध खेळ सर्व माता महिला यांनी उत्फुर्स सहभाग नोंदविला होता या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून सुनील भाऊ मुंडे कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती मुंडे किस्किंदा तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच श्रीमती मुंडे जयश्री व उपाध्यक्ष भारतीय सिद्धेश्वर हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती जाधवर मॅडम यांनी केले तर या कार्यक्रमाला मार्गदर्शक सुनील भाऊ मुंडे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमात होम मिनिस्टर कार्यक्रम दही तिडक व दासरी एस आर यांनी केलेले आहेत या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण टिपरे विमा सेवा केंद्र वडवणी यांच्या माध्यमातून देण्यात आले यावेळी श्रीमती प्रभावती जाधवर मॅडम श्रीमती शितल धस मॅडम श्रीमती पूजा टिपरे यांनी याचे आयोजन करण्यात आले होते या विजेत्या महिलांना टिपरे विमा केंद्र सेवा यांच्यातर्फे चार उत्कृष्ट अशा पैठणी साड्या भेट देण्यात आल्या अशाप्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठार बंद या ठिकाणी महिलांचा हळदीकुंकू चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

माझ्यासोबत घातपाताचा प्रकार,अंगावर गाडी घालण्याचाही प्रयत्न; जरांगेंचा गौप्यस्फोट

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित


जालना : माझ्यासोबत घातपाताचा प्रकार करण्याचा प्रयत्न झाला असून, अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्नही करण्यात आल्याचा संशय असल्याचे मनोज जरांगे म्हणाले आहे. नाशिक जिल्ह्यातील दौऱ्यावर असतांना सालेर किल्यावर हा प्रकार घडला असल्याचा दावा जरांगे यांनी केला आहे. सोबतच आपल्याही जीवाला धोका असू शकतो, पण याला आम्ही घाबरत नाही. तसेच अशा घटनांची भुजबळांप्रमाणे कुठेही वाच्यता करत नसल्याचे देखील जरांगे म्हणाले आहेत. मराठा आरक्षणाबाबत काढण्यात आलेल्या अध्यादेशाची अमलबजावणीच्या मागणीसाठी मनोज जरांगे आजपासून पुन्हा आमरण उपोषण करणार आहे. विशेष म्हणजे आपले उपोषण आता कठोर असणार असून, या काळात आपण ना पाणी घेणार, ना उपचार घेणार अशी भूमिका मनोज जरांगे यांनी घेतली आहे. मराठा समाजाला सरकारने दिलेल्या राजपत्रित अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर व्हावे यासाठी आपण उपोषण करत असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. याचवेळी बोलतांना जरांगे यांनी आपल्या अंगावर गाडी घालून, अपघात झाल्याचा बनाव करण्याचा प्रयत्न झाला होता. पोलिसांनी त्या वाहनचालकाला ताब्यात देखील घेतले होते, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ओएसडी यांना माहिती दिली असल्याचं जरांगे म्हणाले आहेत.



समृद्धी महामार्गावर कंटेनर-स्विफ्टचा भीषण अपघात; तिघांचा जागीच मृत्यू

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

अहमदनगर: गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या पुन्हा वाढली आहे. समृद्धी महामार्गावर अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील धोत्रे शिवारात शुक्रवारी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या नादुरुस्त ट्रेलरला भरधाव स्विफ्ट कारने धडक दिली. या भीषण अपघात ३ जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोघे जखमी आहेत. जखमींवर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे. तर तिघांचे मृतदेह कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात शविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहे. दोन दिवसांपूर्वी याच परिसरात अपघात होऊन कल्याण येथील दोघा तरुणांचा मृत्यू झाला होता आणि आज पुन्हा तीन जणांचा मृत्यू झाला. राहुल राजभोज, उमेश उगले, भाऊसाहेब पैठणे असे अपघातातील मृताची नावे आहेत.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या वाढदिवसानिमित्त कामगारांना १ हजार टोप्यांचे वाटप

सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ (बंटी) नवले यांचा विशेष उपक्रम

पुणे- प्रतिनिधी/ रिजवान बागवान

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब याच्या वाढदिवसानिमित्त शिरूर तालुक्यातील कारेगाव येथे शिवसेना युवासेनेचे शिरूर तालुका उपप्रमुख यांच्या वतीने हजारो कामगारांना टोप्यांचे वाटप करण्यात आले आहे.

शिवसेना उपनेते माजी खासदार श्री शिवाजी दादा आढळराव पाटील यांचे,जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे व तालुका प्रमुख शरद नवले यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगीक परीसरात उन्हामध्ये उघड्यावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना कडक उन्हापासून काही प्रमाणात संरक्षण होइल या हेतूने १ हजार टोप्या कामगारांना वाटप करण्यात आल्याची माहिती सोमनाथ (बंटी) नवले यांनी दिली आहे.



यावेळी उपस्थित कामगारांनी ''आढळराव पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है''चा नारा दिला.सोबतच आभार देखील मानले.

यशवंत प्राथमिक शाळा येथे हळदी कुंकूम चा कार्यक्रम साजरा करण्यात आला





दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

अहमदपूर:-यशवंत प्राथमिक शाळा अहमदपूर येथे हळदी कुंकूम चा कार्यक्रम घेण्यात आले या कर्यक्रमाचे अध्यक्ष सौ.सुनिता ताई चवळे प्रमुख पाहुणे सौ. अयोध्याताई केंद्रे ,अस्विनी ताई कासनाळे ,सौ. वर्षाताई शिवपूजे सौ. उषा ताई लुंगारे .दैनिक जनप्रभात चे उपसंपादक तथा उढ इंडिया न्यूज चॅनल चे उपसंपादक अहमदपूर यशवंत शाळेचे मुख्याध्यापक श्री पारशेट्टे आर. आर, शाखा प्रमुख श्री .बिराजदार व्ही. व्ही , करंजकर सर ,श्री आष्टे सर ,श्री बडगिरे सर ,सौ .आठवले मॅडम, सौ.रेखा फड मॅडम , दैठणकर मॅडम ,सौ. राजे मॅडम ,सौ.जोगदंड मॅडम ,सौ. पाटील मॅडम व शाळेतील विध्यार्थी व पालक आदी उपस्थित होते.

कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचे कोराडी विज निर्मिती केंद्र गेटसमोर आंदोलन

कोराडी, दिलीप येवले- राज्यव्यापी आंदोलनाचा पहिला टप्पा महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कामगार संघटना संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या राज्यव्यापी आंदोलनाचा पहिला टप्पा औष्णिक वीज निर्मिती केंद्रांच्या कोराडी गेटसमोर पार पडला. यावेळी कंत्राटी वीज कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आजच्या द्वार सभेत बहुसंख्येने महिला व पुरूष कंत्राटी कामगार न्याय हक्काच्या मागण्यांसाठी जातीने हजर होते. शुक्रवारी झालेल्या द्वारसभेत



महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे भाई चैनदास भालाधरे प्रमुख मार्गदर्शक राहुल नागदेवे यांनी सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना आंदोलनाच्या मागण्यांबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कंत्राटी कामगार संयुक्त कृती समिती, कोराडीचे सल्लागार भीमराव बजनघाटे, अध्यक्ष राहुल नागदेवे, सचिव वामन मराठे, उपाध्यक्ष वैभव बडे , सहसचिव मोहन देशमुख, सीताराम हटवार, अनील बोरकर, विनोद बोरकर, प्रितम लोहासारवा शहर अध्यक्ष इत्यादींनी कामगारांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी कृती समितीचे सदस्य महेंद्र बागडे, संजय करडभाजने, अंजित गेडाम, प्रतीक रंगारी, अविनाश सोनारे, प्रशांत अडकणे, शिवशंकर बडवाईक, शेषराज जामगडे आदी मोठ्या संख्येत २१० मेगावॉट व ६६० मेगावॉटचे कंत्राटी कर्मचारी उपस्थित होते.

भाजप कार्यकर्त्यांनी केंद्रातील मोदी सरकार व राज्य सरकारच्या विविध महत्त्वकांसी योजना

समाजातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटन अधिक बळकट करावे -भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

कामठी:-नंदू कोल्हे

भाजप कार्यकर्त्यांनी केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील शिंदे- फडणवीस -अजित पवार सरकारच्या विविध महत्त्वाकांक्षी योजना समाजातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटन अधिक बळकट करण्याचे आव्हान प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामठी तालुक्यात तालुक्यातील वडोदा येथे आयोजित गाव चलो अभियानात बूथ कमिटी- सुपर वारीयर्स मेळाव्यात मार्गदर्शन करताना व्यक्त केले. प्रदेश भाजप अध्यक्ष व विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामठी तालुक्यातील वडोदा येथे आज सकाळी ११ वाजता भाजप गाव चलो अभियानाची सुरुवात हुतात्मा स्मारक येथे हुतात्म्यांना अभिवादन व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून केले मोटार सायकल रॅलीला सुरुवात केली मोटार सायकलने वडोदा गावात नगर भ्रमण करीत शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचे समापन करण्यात आले त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच राजू थोटे, उपसरपंच दत्तू हलमारे, ग्रामविकास अधिकारी इगळे व सदस्यांची चर्चा करून ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामासंदर्भात चर्चा केली. वडोदा गावाच्या विकासाकरिता आपण मोठया प्रमाणात निधी देणार असल्याचे आश्वासन सुद्धा दिले त्यानंतर देवी मंदिर परिसरात आयोजित बुथ प्रमुख, बुथ अध्यक्ष ,सचिव ,सुपर वॉरियर ळाव्यात मार्गदर्शन करताना प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,भाजप जिल्हा अध्यक्ष सुधाकर कोहळे ,आमदार टेकचद सावरकर मार्गदर्शन करताना म्हणाले प्रत्येक भाजप कार्यकर्त्यांनी केंद्रात दहा वर्षापासून नरेंद्र मोदी पंतप्रधान असून त्यांनी विकास कामाकरिता अनेक महत्त्वकांशी योजनाची अंमलबजावणी केली आहे त्या योजनाची माहिती समाजातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवून पक्ष संघटन अधिक बळकट करण्याचे आव्हान केले सोबतच महिला मेळाव्यात सुद्धा प्रमुख अतिथीनि मार्गदर्शन केले विविध विकास कामाचे भूमिपूजन सुद्धा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले गोपीचंद अडारकर ८० वर्षीय शेतकऱ्यासी विविध पीक व पिकाचे नियोजन



शेती उत्पादना बाबत चर्चा करण्यात आली, वडोदा येथील ७३ वर्षीय अरुण पिंपळे यांच्याशी गावातील विकासासंदर्भात प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चर्चा केली गाव चलो अभियानात नागपूर जिल्हा भाजप अध्यक्ष सुधाकर कोहळे ,रामटेक लोकसभा संघटन प्रमुख अरविंद गजभिये, नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान , अजय बोधारे ,नागपूर जिल्हा भाजप महिला आघाडी अध्यक्ष अनुराधा आमिन, संकेत बावनकुळे , तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके ,प्रदेश भाजप युवा मोर्चा महामंत्री कपिल गायधने, चेतन खडसे, डॉ संदीप कश्यप, संजय कनोजिया, कामठी तालुका भाजप युवा मोर्चा अध्यक्ष किरण राऊत ,लतेश्वरी काळे ,सचिन घोडमारे ,विशाल चामठ, किशोर बेले,भगवान मेंढे,रमेश चिकटे ,माजी सभापती रामकृष्ण वंजारी ,अनिता चिकटे, मनीष कारेमोरे , ब्रह्मानंद काळे, विजय कोंडुलवार, राजकिरण बर्वे ,गजानन तिरपुडे, लक्ष्मण तरारे, सह मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते

संघशक्ती कल्याणकारी राष्ट्रनिर्माणाचा आधार आहे.- संजय शेळके



विरुळ आकाजी

मानवी जीवनात सुखी आणि समाधानी असण्याचे एक महत्वाचे साधन म्हणजे शरीरातील सबंध उर्जेचा सम्यक वापर होय. ही उर्जा जेव्हा सांघिक स्वरुपात वापरली जाते तेव्हा मानवी जीवन तर सुखी होतेच, सोबत समाज जीवनात सम्यक चेतना निर्माण होऊन राष्ट्र कल्याणकारी सहजिवनासाठी प्रेरीत होते. अशा राष्ट्रात सुख आणि समाधानी लोक राहत असतात. असे प्रतिपादन सालफळ शाळेचे मुख्याध्यापक मान. संजय शेळके यांनी केले. वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत शाळांचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव नुकताच वर्धा येथे संपन्न झाला. त्या स्पर्धेत आर्वी विभागाला चॅम्पियन ट्रॉफी मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सालफळ शाळेतील मुलांच्या अभिनंदन सोहळ्यात ते बोलत होते. चॅम्पियन ट्रॉफी मिळवणाऱ्या आर्वी तालुक्याला मिळालेल्या १८ गुणांपैकी ११ गुण एकट्या सालफळ शाळेचे आहेत आणि हे यश संघटन शक्तीशिवाय प्राप्त करता येत नाही असेही ते म्हणाले. वर्धा येथील जिल्हा क्रीडा मैदानावर संघशक्तीने मिळविलेले हे यश आपण येणाऱ्या काळात राष्ट्र निर्माणासाठी उपयोगात आणावे असेही त्यांनी सांगितले.

मान. सरपंच सुरज कदम आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मान. किशोर ढाणके यांनी शाळेत भेटी देवून विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक आणि अभिनंदन केले. मान. गटविकास अधिकारी. मरसकोल्हे मॅडम, मान. गट शिक्षणाधिकारी पारडे साहेब, तायडे मॅडम आणि तायडे साहेब यांनी सालफळ शाळेच्या विद्यार्थ्यांना सदिच्छा दिल्या.

वेध प्रतिष्ठानचे साहित्यिक, शाळा, शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर

(ना.गो. थुटे, विनोद शेंडगे, थुगाव निपाणी शाळा, सुनंदा आसोले, वासुदेव मोहाडीकर , राजेंद्र टेकाडे पुरस्काराचे मानकरी)

नरखेड प्रतिनिधी ता १०

शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या वेध प्रतिष्ठान नागपूर द्वारा साहित्यिक, शाळा व शिक्षक यांना प्रदान करण्यात येणारे अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाणारे पुरस्कार जाहीर करण्यात आले. साहित्य क्षेत्रात प्रदान करण्यात येणारा ''बोलीमहर्षी डॉ.हरिश्चंद्र बोरकर साहित्यवेध पुरस्कार'' चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील झाडीबोली आणि मराठी साहित्य क्षेत्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक नागो गोविंद थुटे यांना जाहीर करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांसाठी असणारा ''शिक्षणतज्ज्ञ जे. पी.नाईक राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार'' परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडबोरगाव ता. मानवत येथील अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्राचे मुख्य प्रवर्तक विनोद शेंडगे यांना जाहीर करण्यात आला असून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शाळांसाठी असणारा ''कर्मवीर भाऊराव पाटील शाळा गौरव पुरस्कार'' जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी, पं. स. नरखेड जिल्हा नागपूर (मुख्याध्यापक धनंजय पकडे) ह्या शाळेला जाहीर करण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील शिक्षकांसाठी असणारा ''साने गुरुजी जिल्हास्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार'' सुनंदा भगवान आसोले (जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तोंडाखैरी पं. स. कळमेश्वर जि. प. नागपूर) आणि वासुदेव मोहाडीकर (धरमपेठ माध्यमिक कन्या विद्यालय नागपूर) यांना तसेच वेध प्रतिष्ठान मध्ये समर्पण भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी असणारा ''शिक्षणवेध कार्यकर्ता पुरस्कार'' राजेंद्र रामहरी टेकाडे ता.काटोल जि.नागपूर यांना जाहीर करण्यात आला. साहित्यिक आणि शिक्षक यांना प्रदान करण्यात येणारे पुरस्कार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ



नागो थुटे | विनोद शेंडगे | धनंजय पकडे

वासुदेव मोहाडीकर | सुनंदा आसोले | राजेंद्र टेकाडे

या स्वरूपात असून शाळा व कार्यकर्त्यांसाठी असणारे पुरस्कार स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ या स्वरूपात असणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ रविवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ ला जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी ता. नरखेड जि. नागपूर येथे संपन्न होणार आहे असे वेध प्रतिष्ठान नागपूरचे अध्यक्ष डॉ. मनोहर नरांजे, सचिव खुशाल कापसे यांनी कळविले आहे.

सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोसिएशन वर्धा द्वारे क्रिकेट सामने संपन्न

हाय होल्टेज क्रिकेट प्रीमिअर लीग क्रिकेट सामने पुलगाव येथे संपन्न

विरुळ आकाजी

सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोसिएशन वर्धा द्वारे आयोजक आर. के. हायस्कूल पुलगाव च्या ग्राउंडवर हाय होल्टेज क्रिकेट लीग चे सामने तीन व चार फरवरी ला घेण्यात आले होते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उत्घाटक प्रकाशजी कोळसे (रिजनल सेक्रेटरी एस ई ए नागपूर रिजन), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मान्यवर प्रशांतजी गायकवाड कार्यकारी अभियंता आर्वी,हेमंतजी पावडे कार्यकारी अभियंता हिंगणघाट, तसेच मार्गदर्शन संजय जी पाटील अतिरिक्त कार्यकारी अभियंता,प्रेम जी तेलरांध्ये उपकार्यकारी अभियंता ई उपस्थित होते या कार्यक्रमात सोळा कर्मचारी संघांनी सहभाग घेतला होता या सामन्यात विजेतेपद आष्टी उपविभागाने पटकाविले तर उपविजेते पद कारंजा उपविभागाने पटकाविले आहे हे क्रिकेट सामने पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत होती



राष्ट्रवादीने आंदोलनाचा ईशारा देताच कांढळी ते सिंदी (रेल्वे) रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात...


राष्ट्रवादीचे अतुल वांदिले यांनी सात दिवसात कांढळी ते सिंदी (रेल्वे) रस्त्याचे काम चालू न केल्यास आंदोलन करण्याचा दिला होता ईशारा...

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपुर:- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी सात दिवसात कांढळी ते सिंदी (रेल्वे) रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात न केल्यास आंदोलन करण्यात येईल असा ईशारा देताच रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.

काढंळी ते सिंदी रेल्वे रस्त्याचे बांधकाम मागील चार वर्षापासून रखडलेले असून संत गतीने चालू आहे. या मुळे या मार्गाने ये-जा करण्यास नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.सिंदी ते काढंळी हा मुख्य मार्ग असून या रस्त्याने मोठे वाहन, बस तसेच दररोज हजारो नागरिक याच रस्त्याने ये-जा करीत असतात. या रस्त्याला ग्रामीण भाग जोडलेला असून येथील नागरिक हिंगणघाट, नागपूर येथे बाजारपेठ, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याकरिता तसेच आजारी व्यक्तीला रुग्णालयात उपचाराकरिता नेण्याकरिता याच रस्त्याने जावे लागते. रस्ता खराब व नादुरस्त असल्याने व रस्त्याचे बांधकाम संत गतीने असल्यामुळे या मार्गावर अनेक अपघात झाले आहे.मागील चार वर्षापासून या रोडचे बांधकाम संथ गतीने असल्याने रोडवर धुळीचे साम्राज्य आहे. तसेच या रोडवर बारीक गीट्ठी पडलेली असल्याने अनेक गाड्या देखील पंच्चर देखील होत आहे. याचा सुद्धा रस्त्यावर ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

याकरिता कांढली ते सिंदी रेल्वे रस्त्याचे रखडलेले बांधकाम तात्काळ सुरु करण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी सात दिवसात रस्त्याचे बांधकाम चालू न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात असा ईशारा देताच रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात झाली असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रस्त्याचे बांधकाम चालू झाल्याने गावातील नागरिकांनी प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांचे आभार मानले...



परदेश दौऱ्यासाठी नितीन डगवार यांची निवड

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपूर : - राज्यातील शेतकऱ्याचा देशाबाहेरील अभ्यास दौरा सन २०२३-२४अंतर्गत जिल्ह्यातील प्राप्त अर्जामधील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची जिल्हास्तरिय दौरा समिती व संबंधित सर्व शेतकऱ्याच्या समक्ष लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आली. यामध्ये तालुक्यातील प्रगतशील युवा शेतकरी नितीन नारायण डगवार यांची जिल्ह्यातून निवड झाली. परदेशी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, कृषिमाल प्रक्रिया व पुरवठा साखळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना समजावी यासाठीची बंद केलेली शेतकरी परदेश दौरा योजना आता मार्च २०२४ पासून नव्याने सुरू करण्यात आली आहे. यासाठी हिवाळी अधिवेशनात १० कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली.परदेशातील शेतीचे तंत्रज्ञान, पीक, सिंचन पद्धतींचा सखोल अभ्यास शेतकरी करून तशा पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करत असतात.राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढ हे ध्येय न ठेवता उत्पादित होणाऱ्या शेतीमालाला चांगला दर्जा देऊन भाव मिळविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करावा, असे कृषी विभागाचे उद्दिष्ट असते.शेतीशी निगडित जगात होणारे बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांचे परदेश दौरे आयोजित केले जात होते. या दौऱ्यांत क्षेत्रीय भेटी, संलग्न विषयांबाबत प्रक्रिया संस्थांना भेटी, बाजारपेठा, कृषी विद्यापीठे व संशोधन संस्था, दुग्ध व्यवसाय व फळबाग, फुलशेती आदींबाबत शेतकऱ्याना ज्ञान मिळते. या दौऱ्यासाठी जिल्ह्यातून नितीन डगवार यांची निवड झाल्याने आनंदाचे वातावरण आहे. किशोर आस्कर,विक्रांत वानकर, भोला भोयर, उमेश पोटे, अमोल शंभरकर , राम काळे,जयंत चौधरी, रविंद्र लांबट , किशोर ठाकरे , मधूकर कामडी, अशोक डगवार ,भास्कर मुडे , अरविंद मुरुमारे, सुनिल मांडवकर, प्रविण मंगेकर, प्रशांत ठोंबरे, सुरेंद्र बोचरे, प्रविण बादले, जयकृष्ण खेडीकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



जि. प. प्राथमिक शाळेचा जागेवर असलेले अतिक्रमण मोकळे करा

कोराडी वार्ताहर : -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीवास नगर महादुला येथील शाळेच्या आवारात कलावती गोरखडे यांनी अतिक्रमण केलेले असून ते तत्काळ काढाचे पत्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने कलावती गौरखेडे यांना वारंवार दिलेले असून तरी गौरखेडे अतिक्रमण काढतच नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने लेखी तक्रारीची पत्र कोराडी पोलीस स्टेशन, नगरपंचायत महादुला येथे लेकिन निवेदनासह सादर करण्यात आलेले आहे. मात्र गौरखेडे परिवार अतिक्रमण ची जागा मोकळी करत नाही व शिक्षकांना दमदाटी केल्याच्या प्रकार घडत असून यावर कोराडी पोलीस



स्टेशन, नगर पंचायत महादुला, मुख्यकार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती कामठी, केंद्रप्रमुख यांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे. यावर गौरखेडे यांच्यावर कोणती कार्यवाही होणार याच्यावर सर्वांचे लक्ष लागून आहे.

दोन दिवस जेवण करु नका, आई वडिलांना मतदान कुणाला करायचं ते सांगा, संतोष बांगर पुन्हा एकदा वादात

दै,जनप्रभात
उपसंपादक
राठोड रमेश पंडित



हिंगोली : महाराष्ट्रात जून २०२२ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी बंड केल्यापासून एका आमदाराचं नाव सातत्यानं चर्चेत आणि वादाच्या भोवऱ्यात कायम आहे. हिंगोलीतील कळमनुरीचे आमदार संतोष बांगर सुरत गुवाहाटीमध्ये एकनाथ शिंदे यांच्या सोबत नव्हते. एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या बहुमत चाचणी वेळी ते ठाकरेंना सोडून शिंदेंसोबत गेले. तेव्हापासून संतोष बांगर हे सातत्यानं अनेक गोष्टींमुळं वादात अडकत असतात. आता देखील संतोष बांगर यांचा देखील एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. बांगर यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आई वडिलांनी मतदान कुणाला करावं यासंदर्भात प्रश्न विचारला आहे. शिवसेना आमदार संतोष बांगर यांचा चिमुकल्या विद्यार्थ्यासोबत धक्कादायक संवादाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. हिंगोलीतील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा कळमनुरी मतदार विधानसभा मतदारसंघाचे आमदार संतोष बांगर हे नेहमीच वादग्रस्त वक्तव्य करत असल्याने चर्चेत राहतात. त्यांनी हिंगोलीच्या औंढा नागनाथ तालुक्यात असलेल्या लाख गावांमध्ये शाळेमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांसोबत धक्कादायक संवाद केला आहे. ते लाख गावांमध्ये गावातील विकासकांचे उद्घाटन व शाळेमध्ये विकास कामाच्या भूमिपूजन निमित्ताने कार्यक्रमाला गेलेले होते. यावेळी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसोबत बोलताना त्यांनी धक्कादायक प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले.

डॉक्टरच नाहीत;उपचार करायचा तरी कोणाकडून?
तारासावंग्याचा पशुवैद्यकीय दवाखाना वार्यावर



आष्टी(श.) :- मागील गेल्या ६-७ महीन्यांपासुन तारासावंगा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध नसल्याने सदर पशुवैद्यकीय दवाखाना वार्यावर पडला की काय?असा प्रश्न परिसरातील पशुपालकांना पडला आहे.परिणामी पशुवैद्यकीय अधिकारीच नसल्याने पशुपालकांना आपल्या जनावरांवर उपचार खाजगी डॉक्टरांकडून करावा लागत असून,त्यांच्यावर मोठा आर्थिक भुर्दंड देखील बसत आहे.तारासावंगा येथील पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत अनेक गावे येतात.माणिकवाडा, मोई,तांडा, मुबारकपुर, वाडेगाव, कोल्हा काडी, सालोरा, पेठ अशा एकुन ८ गावांचा समावेश आहेत.या परिसरातील शेतकर्यांकडे मोठ्या प्रमाणात जनावरे आहेत.त्यांच्या उपचारांसाठी तारासावंगा येथील एकमेव पशुवैद्यकीय दवाखाना आहे.येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.पाटील यांचे ६-७ महीन्यांपुर्वी निधन झाले होते.तेव्हापासून येथील पशुवैद्यकीय अधिकार्यांचे पद खाली आहे.तर येथील अतिरीक्त पशुवैद्यकिय अधिकार्याचा पदभार उमेश गावंडे यांच्याकडे आहेत.त्यांच्याकडे तळेगावचा मुख्य तारासावंगा येथे गेल्या सहा महीन्यांपासुन स्थायी पशुवैद्यकीय अधिकारीच नाही. तारासावंगा येथील पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत एकुन ८ गावे येतात.सध्या पशुवैद्यकीय अधिकारीच नसल्याने उपचार कोणाकडून करायचा हा प्रश्न उपस्थित होत आहे.परिसरातील पशुपालकांना खाजगी डॉक्टरांकडून उपचार करावा लागत असून,आर्थिक भुर्दंड मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे.याबाबत मी वरिष्ठांना तक्रार देखील केली आहे.आता स्थायी अधिकारी तत्काळ न दिल्यास पशुवैद्यकीय दवाखान्याला टाळे ठोकायची वेळ येणार आहे.

रवि ढोमणे पाटील,सामाजिक कार्यकर्ते,तारासावंगा

माझ्या कडे तळेगाव(श्या.)येथील स्थायी पशुवैद्यकीय अधिकार्याचा पदभार आहे. त्यामुळे तारासावंगा येथे ४० कि.मी.अंतरावर जाने शक्य होत नाही.तारासावंगा पशुवैद्यकिय दवाखाना अंतर्गत येणार्या अनेक गावांतुन पशुपालकांचे फोन येतात. परंतु,माझ्या अगोदरच पदभार असल्याने अतिरिक्त ठीकानी जाऊन सेवा देणे शक्य होत नाही.

डॉ.उमेश गावंडे,पशुवैद्यकिय अधिकारी

पशुवैद्यकीय दवाखाना असल्याने त्यांना येथुन येथे उपचार देण्यासाठी येणे शक्य होत नाहीत. त्यामुळे सध्या स्थितीत येथील परिचर गोपाल घुगे हे रोज दवाखाना उघडतात.परंतु,८ गावांचा डोलारा असणार्या पशुवैद्यकिय दवाखान्याला स्थायी पशुवैद्यकीय अधिकारीच नसल्याने हा दवाखाना शोभेची वस्तू ठरत आहे.यामुळे परिसरातील पाळीव प्राण्यांच्या निरोगी आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे याकडे पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष देत तारासावंगा येथे स्थायी पशुवैद्यकीय अधिकारी द्यावे, अन्यथा पशुवैद्यकीय दवाखान्याला टाळे ठोकायची वेळ येईल.अशी मागणी रवि ढोमणे पाटील, कांतेश्वर वाकोडे, महेंद्र घ्यार, आशिष कडू,लोकेश सांभारे, रत्नपाल पाटील, दिलीप रानोकर, शुभम भोगे, राजेंद्र गावंडे, निरंजन ठाकरे, रमेश खोडे, रोशन नासरे, खुशाल ठाकरे, दिपक ढबाले, गणेश भोगे, मारोती मरस्कोल्हे, विजय कडू यांच्यासह अन्य ग्रामस्थांनी केली आहे.

भाडेपट्टेधारकांना संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन

नागपूर, दिलीप येवले-: नझुल विभागाअंतर्गत येणाऱ्या भाडेपट्ट्याचे व त्यावरील सदनिकेचे नुतनीकरण, हस्तांतरण, तारण, भोगवटदार वर्ग-१, नाव समाविष्ट, बांधकाम परवागनी, सफाई गल्लीची मागणी, विभाजन व इतर अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ तयार करण्यात आलेले आहे. करीता सर्व भाडेपट्टेधारक / अर्जदार यांनी https://www.nagpu.gov.in/ संकेतस्थळावरील ट्णखउघ डखछघ मधील ए-छ्र्रींश्र या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सॉफ्टवेअर क्षेत्रातील स्टार्टअप्स आणि उद्योगांनी प्रादेशिक क्षमता गरज यांचा विचार करून आपले संशोधन शाश्वत विकासासाठी विकसित केले पाहिजे - केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी पार्क्स ऑफ इंडियाच्या इन्क्युबेशन सुविधेचे नागपूरात उद्घाटन

नागपूर, दिलीप येवले- सॉफ्टवेअर उद्योगांनी तसेच स्टार्टप्सने प्रादेशिक क्षमता तसेच कमतरता,गरज यांचा विचार करून आपले संशोधन शाश्वत विकासासाठी विकसित केले पाहिजे. यासाठी सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया- एसटीपीआय यासारख्या संस्थांनी विदर्भातील शैक्षणिक आणि अभियांत्रिकी संशोधन संस्थांसोबत समन्वय, संवाद आणि सहकार्य ठेवले पाहिजे आणि सामान्य माणसाच्या जीवनमानात बदलाव घडवून येतील असे शाश्वत संशोधन केले पाहिजे असे आवाहन आज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये केले. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालया अंतर्गत स्वायत्त संस्था असलेल्या सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया एसटीपीआय च्या नागपूरच्या गायत्री नगर येथे इंक्युबॅशन फॅसिलिटीची सुरुवात आज गडकरींच्या झाली त्यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाप्रसंगी सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया- एसटीपीआय चे महासंचालक अरविंद कुमार, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे संयुक्त सचिव संकेत भोंडवे, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे, एसटीपीआय पुण्याचे महासंचालक संजय कुमार गुप्ता प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी माहिती तंत्रज्ञान उद्योगातील निर्यातीला चालना देण्यासाठी एसटीपीआय सुविधेचा फायदा होणार आहे असे सांगून आयात वाढवून आणि निर्यात कमी करून आपण आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करू शकतो असे गडकरी यांनी नमूद केले. विकासाचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे हे सांगून त्यांनी नागपूरमध्ये सुद्धा आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इंटरनेट ऑफ थिंग्स, मशीन लर्निंग यांसारख्या क्षेत्रावर काम करणारे सेंटर ऑफ एक्सलन्स आणि एंटरप्रिनरशिप हे एसटीपीआय तर्फे स्थापन झाले पाहिजे अशी सूचना केली. आज ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरिंग वाहन निर्मिती उद्योग क्षेत्रामध्ये भारत जगात सध्या तिसऱ्या नंबर वर असून पुढील पाच वर्षात आपल्याला प्रथम क्रमांकावर जायचं आहे असे देखील त्यांनी सांगितलं. नागपूरच्या मिहान मध्ये आज माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांचा विस्तार होत असून आतापर्यंत ६८ हजार युवकांना रोजगार मिळाला आहे पुढील एक वर्षात आपण १ लाख युवकांना रोजगार देण्याचे ध्येय ठेवले आहे अशी माहिती देखील गडकरींनी यावेळी दिली. एसटीपीआयचे महाराष्ट्रात मुंबई, नागपूर ,पुणे ,नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद या ठिकाणी सहा प्रादेशिक केंद्र असून एसटीपीआय सेंटर ऑफ इंटरप्रेनरशिप अर्थात उद्यमशीलता केंद्र हे पुणे येथे इलेक्ट्रॉनिक व्हेईकल मध्ये आर्टिफिशल इंटेलीजन्स क्षेत्रात कार्यरत आहे तर अकोल्याच्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात हे केंद्र कृषी तंत्रज्ञानाबाबत कार्यरत आहे अशी माहिती सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया- एसटीपीआयचे महासंचालक अरविंद कुमार यांनी दिली. नागपूरच्या गायत्री नगर भागात १,९६५ चौरस फुटाच्या



जागेवर बांधलेल्या इमारतीमध्ये माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवा , स्टार्टअप्स, उद्योजक, लघु मध्यम उद्योग यांची वाढती मागणी लक्षात घेऊन, एसपीटीआयने २२९ प्लग-अँड-प्ले आसन व्यवस्थेसह सुमारे २८ हजार १५१ चौरस फूट परिसरामध्ये ही इन्क्युबेशन सुविधा उभारली आहे. या इनक्युबेशन सुविधेचा वापर माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवा, उद्योजक आणि युनिट्सद्वारे हाय-स्पीड डेटा कम्युनिकेशन प्रदान करण्यासाठी संसाधन केंद्र म्हणून केला जाईल, ज्यामुळे विदर्भातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील. याप्रसंगी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे संयुक्त सचिव संकेत भोंडवे यांनी त्यांच्या मंत्रालयातर्फे ग्रामीण भागात वित्तीय साक्षरता तसेच डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी करण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती दिली. डिजिटल नागपूर साठी देखील आपण प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितलं. याप्रसंगी भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात आयआयएम सोबत स्टार्ट अप साठी परिसंस्था तयार करण्यासाठीचा एक सामंजस्य करारावर एसटीपीआय आणि आयएमच्या अधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या अंतर्गत मागासवर्गीयद्वारे आणि एसटीपीआयकडून चालू करण्यात आलेल्या सेंटर ऑफ एंटरप्रिनरशिप वित्तीय सहायता म्हणून ५० हजार रुपये धनादेश सुद्धा यावेळी केंद्राना सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडीयाचे अधिकारी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, कर्मचारी उपस्थित होते.

किन्ही येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा
विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन



तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपुर:- तालुक्यातील किन्ही येथे बाल युवा प्रार्थना मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे ३ दिवसीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव आयोजित करण्यात आले होते.तिन दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्राचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात जनावर तपासणी शिबिर,कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम घ्या वतीने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले या शिबिरात २५ युवकांनी रक्तदान केले तर गावकऱ्यांनी साठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या सर्व शिबीरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला या महोत्सवात विष्णूदादा ब्राम्हणवाडे,किशोरदादा साबळे,बंडूजी गिरी, लुंगे परचके डॉ.अमोल मुंगले यांनी ग्राम गीता व महाराजांच्या जीवनावरील प्रकाश टाकत संबोधन केले तसेच गुरूवर्य ह.भ.प.कडूकर महाराज यांच्या मधुर कीर्तनातून सांगता करण्यात आली.महोत्वाला येशस्वी करण्यासाठी सर्व किन्ही गावकरी व बाल युवा ध्यान प्रार्थना मंडळाने सहकार्य केले.

सुराज्य निर्माण सेनेची महाराष्ट्रातील जिल्हा कार्यकारिणी जाहिर



मा.राहुल जागेश्वर मासाळ
अध्यक्ष - यवतमाळ जिल्हा



मा.सर्जेराव नामदेव शिंदे
उपाध्यक्ष - जालना जिल्हा



मा.परेश दिलीप बोरसे
अध्यक्ष - धुळे जिल्हा



मा.मुकुंदा कैलास गोरे
अध्यक्ष - परभणी जिल्हा

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

इंदापूर:- सुराज्य निर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष आकाश दादा पवार व महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमर एकाड, प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती यांच्या नेतृत्वाखाली सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये पोहचत आहे त्याच बरोबर आकाश दादा पवार यांच्या सुचनेवरून सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वत्र मराठी भाषेमध्ये पाटया लावण्याबाबत चे पत्र प्रशासनाला देण्यात येत आहे . त्याच बरोबर मराठवाडा विभाग अध्यक्ष विष्णू भाऊ पोले यांच्या आदेशानुसार जालना जिल्हा उपाध्यक्ष व परभणी जिल्हाध्यक्ष नियुक्ती करण्यात आली आहे.परभणी जिल्हाध्यक्ष पदी मा. मुकदा कैलास गोरे व जालना जिल्हा उपाध्यक्ष सर्जेराव शिंदे यांची निवड करण्यात आली आहे तसेच खानदेश प्रमुख व महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य विजय पाटील यांच्या सुचनेनुसार धुळे जिल्हाध्यक्ष पदी श्री.परेश दिलीप बोरसे यांची निवड प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती यांनी केले. त्याच बरोबर विदर्भ विभाग प्रमुख मनोज बागडे सर यांच्या सुचनेनुसार यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी श्री.राहुल मासाळ सर यांची निवड करण्यात आली आहे पक्षांच्या ध्येय व उद्दिष्टे नुसार संपूर्ण जिल्हात काम करणार असल्याचे माहिती संबंधित जिल्हाध्यक्ष यांनी पत्रकारांना दिली.

हिंगणघाट येथे इमारत व बांधकाम कामगार लाभार्थी मेळावा संपन्न

प्रतिनिधि -अब्दुल कदीर बख्श

हिंगणघाट आमदार समीरभाऊ कुणावार यांच्या हस्ते गृहोपयोगी संच वाटप सोहळा अनुसया पॅलेस हिंगणघाट येथे संपन्न यावेळी माजी नगराध्यक्ष प्रेमबाबू बंसतानी जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, संजय डेहणे अंकुश ठाकुर वामन चंदनखेडे,भुषण पिसे संजय माडे,सुनील डोंगरे, सोनू गवळी , सौरभ पांडे ,प्रफुल्ल बाडे,अमोल खंदार, रवी रोहणकर, विनोद विटाळे,किरण वैद्य,सोनू पांडे, राकेश शर्मा,देवा पडोळे,नरेश युवनाथे दिनेश वर्मा,रवी उपासे, छाया सातपुते, किर्ती सायकार,कौशर अंजूम, शुभांगी डोंगरे,शितल खंदार,समिक्षा मांडवकर,नलिनी सयाम ,शिला सोनारे,मोहन तुमराम, प्रमोद जुमडे,रूपेश काटकर, मनोज मिसाळ, प्रफुल्ल क्षिरसागर, तुषार येणोरकर,भुषण आष्टणकर ,सौरभ शिवणकर, खुशाल चेले, कैलास टिपले, गौरव तांबोळी, गजानन राऊत,मयुर येसनसुरे,आदी मान्यवर उपस्थित होते.



केशवनगर, कळमना येथील मुक्ताई बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था व्दारे ''वार्षिक स्नेहसंम्मेलन''संपन्न.

कामठी :-नंदू कोल्हे

केशवनगर, कळमना येथील मुक्ताई बहुउद्देशिय शैक्षणिक संस्थाव्दारे ''युनिटी इंग्लिश अप्पर प्रायमरी स्कूल व माँ भवानी उच्च हिन्दी प्राथमिक स्कूल'' येथे वार्षिक स्नेहसंम्मेलन आयोजीत करण्यात आले. वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे आयोजन ''देवतारे सभागृह'' जुना कामठी रोड, ४ नं. नाका, कळमना येथे दि. २३ जानेवारी २०२४ रोजी मंगळवार ला सकाळी ९ वाजता सुरूवात झाली. या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून मा. श्री. शेषरावजी गोतमार (नगरसेवक) कळमना, तसेच प्रमुख पाहूने म्हणून मा. श्री. कुंभरे सर (वी.इ.ओ.), मा. श्री. यशवंतजी बुटके सर (संचालक. युनिटी इंग्लिश अप्पर प्रायमरी स्कूल), मा. श्री. अरविंदजी बुटके सर (संस्था उपाध्यक्ष माँ भवानी उच्च हिन्दी प्राथमिक स्कूल), सौ. मंजुषा मोहारिया (ठाकूर) (मुख्याध्यापिका), सौ. मोनिका मिश्रा मॅम (मुख्याध्यापिका. प्री प्रायमरी स्कूल), यांच्या संयुक्त विद्यमाने दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमात सर्वप्रथम ''एकदंताय, गणेशाय '' या गीताच्या आधारे वेलकम (स्वागतम) नृत्य सादर करण्यात आले. प्री. प्रायमरी वर्गातील छोट्या छोट्या मुलांनी पावसावर आधारीत निसर्ग सत्तेची या समाजमन घडविण्याचा कृतज्ञता वरदानी सुंदर नाट्यछटा सादरीकरण केले. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर नाट्यरचना करून ''मुलगी शिकली, प्रगती झाली'' या काव्यरचनेचा महत्व पालकांना समजावून सांगितली. त्याचप्रकारे रोजच्या परिस्थिवर निर्धारीत असलेल्या पालकांची तसेच मुलांची परिस्थीती सोशियल मिडीयावरील नाटकाव्दारे जनजागृती व्हावी यासाठी (मोबाईल) वरून मुलांच्या जिवनशैलीचे वर्णन करण्यात आले. विविध प्रांतातील विविध वेशभुषा करून वेगवेगळया पोशाख वापर करून प्रांतीय नृत्य सादर केले. पंजाबी नृत्य, वि नृत्य, कोळी नृत्य, राजस्थानी नृत्य, महाराष्ट्रीयन नृत्य, गुजराती नृत्य तसेच देशभक्ती नृत्य व भक्ती नृत्य सादर करण्यात आले. भारत देशातील विविध प्रांतातील नृत्याव्दारे सर्वधर्म समभाव हा संदेश देण्यात आला. देशभक्ती गिताव्दारे राष्ट्रध्वजाचे महत्व व आदर याबद्दल (पिरॅमिड) नृत्य करण्यात आले. दि. २४ जानेवारी रोजी बुधवारला ''भोजनाची'' व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सिमरन ठाकूर व रेखा गोठने मॅम यांनी केला. तसेच आभार व पाहुन्यांचे स्वागत सौ. ज्योती पारधी मॅम यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित कु. रूपाली लोडेकर मॅम, सौ. कोशल्या मरकाम मॅम, कु. सिमा शाहू मॅम, कु. रिया शाहू मॅम, कु. पियुशा शाहू मॅम, तसेच माँ भवानी उच्च हिन्दी प्राथमिक शाळेतील श्री. ओमप्रकाश बुटके सर, श्री. पवन श्रीखंडे सर, श्री. महेन्द्र नारनवरे सर, माया राऊत मॅडम, कु. हेमलता भांडारकर मॅम, कु. समिक्षा पकडे मॅडम, बबिता शाहू मॅडम, कु. खुशी शाहू मॅडम, रोशनी खेब्रागडे मॅडम, सौ. मनसा माझी मॅडम, रेखा शाहू मॅडम तसेच शाळेतील कर्मचारी संघ या सर्वाच्या सहस्ताने कार्यक्रम आनंदात संपन्न झाले



मुस्लिम विकास परिषदेच्या पुणे जिल्हा संपर्क प्रमुखपदी रिजवान बागवान

प्रतिनिधी /रिजवान बागवान

पुणे- मुस्लिम विकास परिषद महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा.अब्दुल सत्तार इनामदार साहेब यांच्या नेतृत्वाखाली तसेच मुस्लिम विकास परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा.शेरखान अकबरखान यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील शिरूर शहर या ठिकाणी मुस्लिम समाज बांधवांची महत्वपुर्ण बैठक पार पडली.या बैठकीमध्ये पुणे जिल्हा कार्यकारणी संदर्भात तसेच मुस्लिम समाजाच्या समस्या व अडिअडचणी आदि. विषयांवर चर्चा करण्यात आली.या बैठकीमध्ये मुस्लिम विकास परिषदेच्या पुणे जिल्हा संपर्कप्रमुखपदी धडाडीचे युवा कार्यकर्ते रिजवान बागवान यांची निवड सर्वांनुमते जाहिर करण्यात आली. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र मुस्लिम विकास परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शेरखान अकबरखान यांच्या शुभहस्ते रिजवान बागवान यांना निवडीचे पत्र देऊन गौरविण्यात आले.तसेच पुढील वाटचालीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आपण मुस्लिम समाज बांधवांच्या विविध प्रश्न, समस्या,अडिअडचणी आदि. विषयांवरती मुस्लिम विकास परिषद या सामाजिक संघटनेच्या माध्यमातुन सोडविणार असल्याचे रिजवान बागवान यांनी सांगितले आहे. या निवडीबद्दल रिजवान बागवान यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.



उपकंत्राटदाराला नो एण्ट्री !

पालिकेने मागणी फेटाळली

मुंबई : सिमेंट काँक्रीटच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी ६ हजार ३७३ कोटींच्या निविदा मागवण्यात आल्या आहेत. परंतु या कामांत उपकंत्राट व प्रभागनिहाय कंत्राट देण्यात यावी, अशी कंत्राटदारांची मागणी पालिका प्रशासनाने फेटाळली आहे.

मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका प्रशासनाला दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर तातडीने निविदा प्रक्रिया राबवत पहिल्या टप्प्यात सहा हजार कोटींचे कंत्राट देण्यात आले. मात्र पहिल्या टप्प्यातील कामे सुरू झाली नसताना दुसऱ्या टप्प्यातील ४०० किमी अंतराचे २०० हून अधिक रस्ते कामासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. मात्र दुसऱ्या टप्प्यातील कामात उपकंत्राट व प्रभागनिहाय कंत्राट देण्यात यावे अशी मागणी कंत्राटदारांनी पालिका प्रशासनाकडे केली होती. मात्र पालिका प्रशासनाने कंत्राटदारांची मागणी फेटाळल्याचे सांगण्यात आले.

संपूर्ण स्वच्छता अभियानात आयुक्त ग्राऊंड झीरोवर

रस्त्यांच्या दुतर्फा बेवारस वाहने हटवा; आयुक्तांचे सक्त निर्देश

मुंबई : मार्च २०२० मध्ये मुंबईत कोरोनाचा शिरकाव झाला, त्यानंतर मे महिन्यात पदभार स्वीकारताच पालिका आयुक्त डॉ. इक्बालसिंह चहल यांनी स्लम एरियात जाऊन आढावा घेतला होता. आता पुन्हा एकदा स्वच्छता मोहिमेत सक्रिय होऊन स्वच्छ व सुंदर मुंबईसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. चहल यांनी शनिवारी अंधेरी पूर्व व गोरेगाव येथे स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेत स्वतः गल्लीबोळातील रस्त्यांची सफाई करत पाणी फवारणी केली. दरम्यान, रस्त्यांच्या दुतर्फा बेवारस वाहने, रस्त्यांवर लटकणाऱ्या केबल हटवण्याचे सक्त निर्देश चहल यांनी पालिकेच्या संबंधित विभागाला दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, स्वच्छ, सुंदर आणि हरित मुंबईसाठी पालिकेकडून प्रत्येक प्रशासकीय विभागात सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. यापूर्वी प्रत्येक परिमंडळात एक याप्रमाणे सात परिमंडळांमध्ये मिळून एकूण सात प्रशासकीय विभागांमध्ये ही मोहीम राबवली जात होती. त्या कार्यपद्धतीनुसार सर्व प्रशासकीय विभागांचा क्रम पूर्ण झाला. स्वच्छता ही निरंतर प्रक्रिया असल्याने त्यात सातत्य राखायला हवे, या भूमिकेतून चहल यांच्या निर्देशानुसार, आता यापुढे दर



शनिवारी सर्व २४ प्रशासकीय विभागात (वॉर्ड) लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शनिवारी करण्यात आलेल्या कार्यवाहीस सर्वत्र स्थानिक नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

रस्ते, पदपथ, लहानसहान गल्लीबोळांमध्ये असलेला घनकचरा तसेच टाकाऊ वस्तू पूर्णपणे काढणे, तसेच ब्रशिंग करून रस्ते, पदपथांवरील धूळ काढणे, त्यानंतर पाण्याने धुणे ही सर्व कार्यवाही करतानाच रस्त्यांवर उगवलेली खुरटी झाडेझुडपे समूळ काढणे, अवैध जाहिरात फलक हटविणे, कीटकनाशक धूर फवारणी, पावसाळी जाळ्या- गटारे व नाले यांची स्वच्छता, धोकादायक तारांचे जंजाळ काढणे आदी विविध कामे सखोल स्वच्छता मोहिमेतून करण्यात येत आहेत. चहल यांनी शनिवारी सकाळी ८ वाजेपासून केलेल्या दौऱ्यात या सर्व कार्यवाहीची पाहणी करतानाच स्वतः सखोल स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग देखील घेतला. यावेळी उप आयुक्त (परिमंडळ ४) विश्वास शंकरवार, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) (अतिरिक्त कार्यभार) संजोग कबरे यांच्यासह के पूर्वचे सहाय्यक आयुक्त मनीष वळंजू, पी दक्षिणचे सहाय्यक आयुक्त संजय जाधव आणि इतर संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

गल्लीबोळात शिरून स्वच्छता!

पी दक्षिण विभागातील गोरेगाव पश्चिम येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, सुंदर नगर जंक्शन, खंडू भंडारी चौक, विठ्ठलपाडा परिसरांमध्ये स्वच्छता मोहिमेत आयुक्त महोदय प्रत्यक्ष सहभागी झाले. विठ्ठलपाडा येथील अरुंद वसाहतीत लहानसहान गल्लीबोळांमध्ये शिरून आयुक्तांनी स्वच्छता केली. पाणी फवारणी करत गल्ली स्वच्छ केली.

निवडक महामुंबई

मुंबईत वास्तव्यास असलेल्या सहा बांगलादेशींना अटक

मुंबई : मुंबई शहरात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या सहा बांगलादेशी नागरिकांना स्थानिक पोलिसांनी अटक केली असून, त्यात एका महिलेचा समावेश आहे. अमीना उमर फारुख शेख, इम्रान आलम शेख, तमजीत शौकत मुल्ला, आलमीन जावेद सरदार, हसन नूरइस्लाम मोरल आणि सुकेराली खालेक मंडल अशी या चौघांची नावे असून, अटकेनंतर या सर्वांना लोकल कोर्टात हजर करण्यात आले होते. बांगलादेशातील बेरोजगारी आणि उपासमारीला कंटाळून ते सर्वजण भारतात पळून आल्याचे तपासात उघडकीस आले आहे. वाडीबंदर, बीपीटी रोडवर काही बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती नागपाडा एटीएसला मिळाली होती. या माहितीनंतर पोलिसांनी तिथे छापा टाकून अमीना शेख या ३६ वर्षांच्या महिलेस अटक केली. दुसऱ्या कारवाईत पोलिसांनी आलमीन सरदार आणि हसन मोरल या दोघांना दिंडोशी पोलिसांच्या एका विशेष पथकाने मालाड येथील वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, जागृती बसस्टॉपजवळील मंसुरी स्टोअरसमोरून अटक केली. ते दोघेही बांगलादेशी नागरिक असून सध्या वसई येथे राहत होते. तिसऱ्या कारवाईत सहार पोलिसांनी सुकेराली मंडल याला अटक केली. अन्य दोन घटनेत तमजीत मुल्ला याला वर्सोवा तर इम्रानला दहिसर पोलिसांनी अटक केली.

घरफोडीच्या गुन्ह्यांतील रेकॉर्डवरील गुन्हेगारास अटक

मुंबई : घरफोडीच्या गुन्ह्यांतील एका रेकॉर्डवरील गुन्हेगारास खार पोलिसांनी अटक केली. प्रेम मोहन राठोड असे या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीचा ९ लाख ६८ हजाराचा सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. त्याच्या अटकेने पाच गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. खार येथे साधना सुनील निर्मल ही महिला राहते. ४ फेब्रुवारीला ही महिला कामानिमित्त बाहेर गेली होती. यावेळी घरात कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने तिच्या घरात प्रवेश करुन ९ लाख ६८ हजाराचा सोने-चांदीचे दागिने आणि कॅश असा मुद्देमाल चोरी केला होता. हा प्रकार घरी आल्यानंतर निदर्शनास येताच तिने चार पोलिसांत तक्रार केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

दागिने बनविण्यासाठी दिलेल्या ११ लाखांच्या सोन्याचा अपहार

मुंबई : दागिने बनविण्यासाठी दिलेल्या सुमारे अकरा लाख रुपयांच्या सोन्याचा अपहार करून एका व्यापाऱ्याची फसवणूक झाल्याचा प्रकार काळबादेवी परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी प्रशांत माणिकलाल बाग या कारागिराविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. भरत साकलचंद जैन हे परळ येथे राहत असून, त्यांचा टी. जे. ज्वेलर्स नावाचे सोन्या-चांदीचे दागिने विक्रीचे दुकान आहे. व्यापाऱ्याकडून शुद्ध सोन्याचे बार घेऊन त्यांना दागिने बनवून त्यांचा व्यवसाय आहे. प्रशांत हा त्यांच्या परिचित कारागिर असून, त्याचे काळबादेवी परिसरात दागिने बनविण्याचे काम चालते.

बोरिवलीत घराचा भाग रिक्षावर कोसळला

दोघे जखमी; इमारतीचे पाडकाम सुरू



मुंबई : बोरिवली पश्चिम गणेश मंदिराजवळील नॅन्सी कॉलनीत तळ अधिक तीन मजली महेंद्र इमारत असून, ती धोकादायक झाल्याने रिकामी करण्यात आली आहे. इमारतीचे पाडकाम सुरू असताना शनिवारी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर घराचा भाग रिक्षावर कोसळला. या दुर्घटनेत रिक्षा चालक जखमी झाले असून, त्यांना जवळील श्रीकृष्णा या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोघांवर उपचार सुरू असल्याचे पालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाकडून सांगण्यात आले.

या दुर्घटनेत राजकुमार लल्लनकुमार राणा यांच्या डोक्याला व हाताला मार लागला आहे, तर सुमन शुक्ला यांनाही पाठीला मार लागला असून, दोघांवर उपचार सुरू आहेत.

अंधेरीतील साची बारमधील छमछमचा पर्दाफाश

मुंबई : मुंबई पोलिसांनी दिलेल्या नियमांचे सर्रासपणे उल्लंघन करून अंधेरीतील साची बारमध्ये रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या छमछमचा गुन्हे शाखेच्या अंमलबजावणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केला. याप्रकरणी बारचा मालक, मॅनेजरसह ३१ जणांवर कारवाई करण्यात आली.

१८ गायिका, बारबालांची सुटका

या कारवाईत गायिका असलेल्या १८ बारबालांची सुटका करण्यात आली आहे.

ताब्यात घेतलेल्या सर्वांना नंतर अंधेरी पोलिसांकडे सोपविण्यात आले होते. या कारवाईमुळे शहरातील बार मालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. अंधेरीतील सहार रोडवरील सिगारेट फॅक्टरीसमोरील चकाला व्हिलेजमध्ये साची (रत्नमहल) नावाचे एक बार अँड रेस्टॉरंट आहे. या बारमध्ये रात्री उशिरापर्यंत बारबालांना ग्राहकांसमोर बॉलीवूड गाण्यांवर अश्लील नृत्य करण्यास प्रवृत्त केले जाते. मुंबई पोलिसांनी गुरुवारी रात्री अचानक छापा टाकला, यावेळी तिथे असलेल्या ग्राहकांसमोरच काही बारबाला अश्लील नृत्य करताना दिसून आल्या.

या कारवाईत पोलिसांनी बारचा मालक, मॅनेजर, कॅशिअर, नऊ स्टीवर्ड-वेटर, चार ऑर्केस्ट्रा कलाकार आणि १५ ग्राहकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी १८ बारबालांची सुटका केली. गायिका म्हणून काम करणाऱ्या या तरुणींना ग्राहकांसोबत अश्लील नृत्य करण्यास प्रवृत्त केले जात असल्याचे उघडकीस आले.

निवारा केंद्र वृद्धाश्रमाचा मार्ग मोकळा

मुंबई : देवनार तानाजी मालुसरे चौकाजवळ आरक्षित भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले होते. वारंवार नोटीस बजावल्यानंतर ही पालिकेच्या नोटीसकडे दुर्लक्ष केले जात होते. अखेर पालिकेच्या एम पूर्व विभागाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने या भूखंडावरील २०० हून अधिक बेकायदा बांधकामांवर बुलडोझर फिरवल्याने निवारा केंद्र, कौशल्य विकास केंद्र, आधार केंद्र, वृद्धाश्रम उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

२०० हून अधिक बेकायदा बांधकामांवर बुलडोझर

सन २०१५, २०१६, २०१७ मध्ये २ वेळा आणि सन २०२० मध्ये; यानुसार गेल्या काही वर्षांत एकूण ५ वेळा या भूखंडावरील अनधिकृत कच्ची बांधकामे हटविण्यात आली आहेत. परंतु, कारवाईनंतर या ठिकाणी अतिक्रमण होत होते. अतिक्रमण स्वतःहून हटवावे यासाठी जाहीर नोटीस लावण्यात आली होती. तरीही दुर्लक्ष केल्याने ही एम पूर्व विभागाने ही कारवाई केल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

तिन्ही रेल्वे मार्गांवर आज मेगाब्लॉक

मुंबई : रुळांची दुरुस्ती ओव्हरहेड वायर दुरुस्ती सिंगल यंत्रणेची दुरुस्ती अशा विविध कामांसाठी रविवार, ११ फेब्रुवारी रोजी मध्य हार्बर व पश्चिम रेल्वे मार्गावर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. दुरुस्तीच्या कालावधीत तिन्ही मार्गांवरील लोकल उशिराने धावत असून, काही लोकल रद्द करण्यात आल्याचे मुंबई उपनगरीय रेल्वेकडून सांगण्यात आले.

मध्य रेल्वेच्या माटुंगा-ठाणे अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.३५ पर्यंत दुरुस्तीचे काम सुरू आहे. या कालावधीत सीएसएमटी स्थानकातून सुटणाऱ्या डाऊन धीम्या मार्गावरील लोकल माटुंगा आणि ठाणे स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात आल्या आहेत, तर शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप, मुलुंड आणि ठाणे स्थानकांदरम्यान थांबतील. तर कल्याण स्थानकातून सुटणाऱ्या अप धीम्या मार्गावरील सेवा ठाणे -माटुंगादरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात आल्या आहेत. तर ठाणे, मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला आणि शीव स्थानकावर थांबतील.

पश्चिम रेल्वे मार्गावर सांताक्रुझ-गोरेगाव स्थानकादरम्यान अप व डाऊन जलद मार्गावर दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कालावधीत सांताक्रुझ-गोरेगाव स्थानकादरम्यान जलद मार्गावरील लोकल धीम्या मार्गावर वळवण्यात आल्या आहेत.

बेलापूर-उरण आणि नेरूळ-उरण सेवा प्रभावित नाही

(नेरूळ/बेलापूर-उरण पोर्ट मार्ग वगळून) या कालावधीत पनवेल स्थानकातून सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या आणि सीएसएमटी स्थानकातून पनवेल, बेलापूरला जाणाऱ्या लोकल सेवा बंद आहे.

सीएसएमटी-वाशी दरम्यान विशेष लोकल!

हार्बर मार्गावर पनवेल-वाशी अप आणि डाउन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते सायंकाळी ४.०५ वाजेपर्यंत दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. ब्लॉक कालावधीत सीएसएमटी-वाशी स्थानकादरम्यान विशेष लोकल चालवण्यात येत आहे, तर ठाणे-वाशी-नेरूळ स्थानकांदरम्यान ट्रान्स हार्बरवर लोकल उपलब्ध आहेत. तर बेलापूर-नेरूळ आणि उरण स्थानकांदरम्यान पोर्टलाईन सेवा उपलब्ध असेल.

१५ विभागांचा भार प्रभारी अभियंत्यांवर

पालिकेच्या कामकाजावर परिणाम

मुंबई : मुंबई महापालिकेच्या विविध विभागांत प्रमुख पदावर कार्यरत मुख अभियंता आपली जबाबदारी पार पाडत असतात. मात्र गेल्या दोन वर्षांपासून पालिकेच्या विविध १५ प्रमुख विभागांची जबाबदारी उपप्रमुख अभियंत्यांवर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे पालिकेच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

८ मार्च २०२२ पासून मुंबई महापालिकेत प्रशासकीय राज्य आहे. ५९९५४ कोटींचा अर्थसंकल्प ८४ हजार कोटींच्या ठेवी असलेल्या मुंबई महापालिकेत प्रत्येक विभागात प्रमुख अभियंत्यांची नियुक्ती करण्यात येते; मात्र दोन वर्षांपासून प्रमुख अभियंता पदाची जबाबदारी उप प्रमुख अभियंत्यांवर सोपवण्यात आली आहे. मात्र कोणत्याही प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करण्यासाठी कायम पद निर्माण करणे आवश्यक असते. परंतु प्रशासन जाणीवपूर्वक ही पदे न भरता आपला हेतू साध्य करून घेण्याचा प्रयत्न असल्याची चर्चाच अभियंत्यांमध्ये सुरु आहे. प्रभारी नियुक्ती केलेल्या प्रमुख अभियंत्याला कोणतेही अधिकार नसल्याने पद रिक्त राहू नये म्हणून तात्पुरता पदभार सोपवला जातो. मात्र रस्ते, पूल, घनकचरा व्यवस्थापन अशा महत्वाच्या विभागांत प्रभारी अभियंता असल्याने कामावर परिणाम होत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

पालिका प्रशासनाने जातीने लक्ष घालत प्रमुख अभियंता पदी कायम प्रमुख अभियंत्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केली आहे.

निर्मिती ठिकाणीच ओला व सुका कचरा वर्गीकरण

नागरी सहभाग, जनजागृतीसाठी पालिकेचा पुढाकार

मुंबई : कचरामुक्त मुंबईसाठी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. यात कचरा उत्पत्तीस्थानाच्या ठिकाणीच ओला किंवा सुका कचरा वर्गीकरण केला जाणार आहे. स्थानिक पातळीवर मुख्यत्वेकरून रहिवासी संस्थांच्या परिसरात कचरा वर्गीकरणाबाबत माहिती, शिक्षण आणि संवाद तसेच जनजागृती केली जाईल. मुंबईत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण हे उत्पत्ती स्त्रोताच्या ठिकाणीच व्हावे, अशा सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक इक्बालसिंह चहल यांनी दिल्या आहेत.

मुंबईतील रहिवासी संस्थांच्या माध्यमातून १ हजार टन इतका जमा होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे, हे घनकचरा व्यवस्थापन विभागासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळेच कचऱ्याच्या उत्पत्तीस्थानाच्या ठिकाणीच वर्गीकरण करण्यासाठी लोकसहभाग वाढवण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी सांगितले. या पुढाकाराचा भाग म्हणून माहिती, शिक्षण आणि संवाद तसेच जनजागृतीसाठी संस्थांची नेमणूक करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

जनजागृतीसाठी भित्तीचित्रांचाही वापर

मुंबईतील नागरिकांमध्ये विविध संदेशांच्या भित्तीचित्रांद्वारे आणि उड्डाणपूल, सार्वजनिक ठिकाणे इत्यादींवर सुशोभीकरणाद्वारे जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. त्यात चित्रे, भित्तीचित्रे इत्यादी प्रकार समाविष्ट असतील. स्वच्छता, कचरा विलगीकरण आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व या माध्यमातून पटवून देण्यात येणार आहे.

कचरा वर्गीकरणाबाबत नागरिकांच्या मानसिकतेत बदल घडवणे यासाठीच थेट संवादाची अधिक गरज आहे. म्हणूनच दैनंदिन कचरा संकलन करण्याच्या प्रक्रियेत ओला आणि सुका कचरा वेगवेगळा टाकण्यासाठी हा संवाद घडणे गरजेचे आहे. त्यामुळे ओला कचरा स्वतंत्ररीत्या संकलित करणे शक्य होईल. मुंबईतील कचऱ्याचे उत्पत्तीस्थान हे घरगुती तसेच रहिवासी संकुलातूनदेखील आहे. म्हणूनच माहिती, संवाद आणि शिक्षण अभियानातून तसेच लोकसहभागातून हा बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे उपायुक्त संजोग कबरे यांनी सांगितले.

पेडर रोड, नेपियन्सी रोडची सफाई यांत्रिक झाडूने

दक्षिण मुंबईतील रस्त्यांनाही व्हीआयपी ट्रिटमेंट

मुंबई : राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, श्रीमंत वर्ग, सेलिब्रेटी हे प्रामुख्याने दक्षिण मुंबईत वास्तव्यास. त्यामुळे या भागात पालिकेकडून नेहमीच तातडीने सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. विशेष म्हणजे, दक्षिण मुंबईतील पेडर रोड नेपियन्सी रोड, वाळकेश्वर आदी भागातील रस्त्यांची सफाई यांत्रिक झाडूने होणार आहे. यासाठी प्रतिकिमीसाठी पालिका दोन हजार रुपये कंत्राटदाराला मोजणार आहे.

मुंबईतील काही मोठ्या प्रमुख रस्त्यांची सफाई ही यांत्रिक झाडूने केली जाते. आता दक्षिण मुंबईतील वाळकेश्वर रोड, पेडर रोड आणि नेपियन्सी रोड यासह या विभागातील प्रमुख रस्त्यांची सफाई यांत्रिक झाडूने केली जाणार आहे. एक वर्षाच्या कालावधीसाठी या यांत्रिक झाडूचा वापर या रस्त्यांवरील साफसफाई केला जाणार आहे. महापालिकेच्या डी विभागामध्ये अर्थात दक्षिण मुंबईतील मलबार हिल आदी परिसरात व्हीआयपी मंत्री, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश व



इतर न्यायाधीश तसेच अनेक राष्ट्रांचे सल्लागार व प्रतिनिधी, भारतातील आघाडीचे उद्योगपती, व्यापारी आणि सेलिब्रेटी राहत आहेत. तसेच वाळकेश्वर रोड, पेडर रोड व नेपियन्सी रोड यावर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची हालचाल असते. त्यामुळे महापालिकेच्या डी विभागाने या विभागातील काही प्रमुख रस्त्यावर यांत्रिक झाडू व इतर संलग्न उपकरणे वापरून याची सफाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

दोन शिफ्टमध्ये चालणार काम!

दोन पाळ्यांमध्ये या यांत्रिक झाडूची सेवा घेण्यात येत आहे. प्रति किलोमीटरसाठी २०५२ रुपये मोजले जाणार आहे. त्यामुळे ६१०३ पाळ्यांसाठी एकूण १ कोटी ३० लाख २४ हजार २९० रुपये खर्च केले जाणार आहे. यासाठी राम इंजिनिअरिंग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनीची निवड करण्यात आली आहे.

युवा सेना अहमदपूर येथे संगम पाटील तालूका प्रमुख तर सुरज पाटील शहर प्रमुख यांची निवड

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

अहमदपूर:- युवा सेना पदाधिकारी आढावा बैठक आज शासकीय विश्रामगृह अहमदपूर येथे युवा सेना पदाधिकारी आढावा बैठक व नियुक्ती असा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा सेना जिल्हाप्रमुख कुलदीप भैय्या सूर्यवंशी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाप्रमुख किरण स्वामी विधानसभा प्रमुख सुनील देशमुख सर तालुकाप्रमुख अहमदपूर गोपीनाथ भाऊ जायभाये शहर प्रमुख लक्ष्मण भाऊ आलगुले तालुकाप्रमुख चाकुर खंडू भाऊ वाघ उपजिल्हाप्रमुख कृष्णा भैया सरवदे महिला



तालुकाप्रमुख सुवर्णाताई रोकडे आदी मान्यवर उपस्थित खालील प्रमाणे निवडी करण्यात आल्या युवा सेना तालुकाप्रमुख आमदपुर संगम पाटील युवा सेना शहर प्रमुख अहमदपूर सुरज पाटील युवा सेना विधानसभा प्रमुख रोहन जाधव युवा सेना विधानसभा समन्वय परमेश्वर पाटील, जाधव किरण ,अविनाश तिडोळे, अक्षय कदम , नागेश वरवटे , राम पाटील , रोहित जाधव आदी उपस्थित होते

कोंढाळी पोलिसांचा माणुसकीचा हात

बिहार राज्यातून भटकंतीत असलेल्या महिलेला बुटीबोरी येथील आश्रमात मिळवून दिला आधार

प्रशांत पवार/

काटोल: -कोंढाळी पोलीस ठाण्यांतर्गत बाजारगावपासून १५ किमी अंतरावर असलेल्या अडेगाव भागात गस्ती दरम्यान कोंढाळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज वाघोडे व पो.कॉ. मनोज आगरकर यांच्या समवेत गस्त घालत असताना एक ४० वर्षीय महिला या परिसरात बेवारस अवस्थेत भटकंती अवस्थेत दिसली. पोलीसांनी विचार पुस केली असता तिने आपले नाव गीतादेवी गणेश मंहत असे सांगितले व राहत्या घराबाबत विचारणा केली असता तिने बिहार राज्यातील रहिवासी असल्याचे सांगितले. परिसरात नातेवाईकाचा शोध घेतला असता कोणीही सापडले नाही. अखेर या महिलेसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस ठाण्याचे अधिकारी पंकज वाघोडे यांनी तिचा प्राथमिक इलाज करून बुटीबोरी येथील 'साथ फाउंडेशन पुनर्जन्मा' आश्रमात दाखल केले. संबंधित महिलेची माहिती असल्यास कोंढाळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार पंकज वाघोडे आणि साथ फाऊंडेशन यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन साथ कोंढाळी पोलिसांनी केले आहे.

कोंढाळी पोलिसांनी बेवारस आढळून आलेल्या महिले बाबतीत संपूर्ण वर्णनासह माहिती वरिष्ठ अधिकार्यांना पाठवली आहे. खरे तर मुंबई-नागपूर-कोलकाता महामार्गावरील कोंढाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या दीड वर्षात कोंढाळी पोलीस स्टेशन हद्दित पाच इसम बेवारस अवस्थेत भटकंती करत आढळून आले.या सर्वांची आसपासच्या लोकांना व जिल्ह्यातील त्यांच्या पोलीस ठाण्याचे हद्दीत विचारणा करून ज्यांचे कुटुंब किंवा नातेवाईक शोधूनही सापडले नाही असे आतापर्यंत पाच व्यक्ती कोंढाळी पोलिसांना बेवारस आढळून आले . कोणताही आधार नसलेल्यांना कोंढाळी पोलिसांचे पथक आणि ठाणेदार पंकज वाघोडे यांनी संबंधित अनाथांवर प्राथमिक उपचार करून त्यांना कपड्यांचे घेऊन साथ फाउंडेशनच्या अनाथाश्रमात पोहोचवले.

कोंढाळीचे ठाणेदार पंकज वाघोडे आणि कोंढाळी पोलिसांनी मानवतेचा आदर्श घालून दिला आहे. पोलिसांच्या खाकी वर्दीतही माणुसकी दिसून आली आहे.

महाबळा येथे तंबाखू मुक्ती अभियान



तालुका प्रतिनिधी

सेलू :- प्रशांत झाडे तालुक्याच्या महाबळा येथील इंदिरा गांधी हायस्कूल मध्ये तंबाखू मुक्ती अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा इरुटकर होत्या.या प्रसंगी प्रामुख्याने आरोग्य सेविका सुनीता वाढवे, शिक्षिका कल्पना श्रीराम,,प्रीती पुंड, प्रज्ञा थुल, प्रिया भोंडे आदी उपस्थित होत्या.तंबाखू सेवानाने होणारे दुष्परिणाम या विषयावर आरोग्य सेविका सुनीता वाढवे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी तंबाखुचे दुष्परिणाम या विषयावर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. तसेच गावातून प्रभातफेरी सुद्धा काढण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वीतेकारिता शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. उपस्थितांचे आभार श्रीरामे यांनी मानले.

करोडो रुपयांचे विकास कामे यामध्ये रस्ते नाली यात निकृष्ट दर्जाचे होत आहे

गुणनियंत्रण अधिकार्याच्या मार्फत चौंकशी करा -मनसे



आर्णी प्रतिनिधी/ धनराज पवार

आर्णी:- महाराष्ट्र शासन विकास निधी अंतर्गत आर्णी नगर परिषद परिसरात चालू असलेले करोडो रुपयांचे विकास कामे यात रस्ते,नाली यात निकृष्ट दर्जाचे होत असून याची गुणनियंत्रण अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आर्णी च्या वतीने निवेदनात देण्यात आली

संबंधित एजन्सी व अधिकारी यात सालेलोट आढळून येत आहे काही कामे बांधकाम विभागातील रोजंदारी कर्मचाऱ्याला पण देण्यात आले आहे व रस्त्याच्या लांबी रुंदीत कामाची तफावत आढळून येत आहे आणि काही ठिकाणे रस्ते उकडत आहे त्यावर पाणी मारण्यात आले नाही व संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करून देयके देण्यात यावी तसेच लवकरात लवकर चौकशी न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आपल्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसे यांनी केला

दिनांक ०८/०२/२४ रोजी निवेदन देण्यात आले निवेदन देतेवेळी उपस्थित असलेले मनसेचे पदधिकारी व मनसेसैनिक सचिन येलगंधेवार,कपिल ठाकरे,दीपक बोरकर,धीरज कोडपे व इतर उपस्थित होते

पालखी दिंडी सोहळ्यामुळे फुलला भक्तीचा मळा

संत केजाजी महाराजांचे जयघोषाने घोराड नगरी दुमदुमली

सेलू : प्रशांत झाडे

विदर्भाची प्रतीपंढरी श्रीक्षेत्र घोराड येथे संत केजाजी महाराजांची ११७ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त शनिवारी भव्य दिव्य पालखी दिंडी सोहळ्यात विविध गावांतील २५० चे वर भजनी मंडळीसह भाविकांची मोठी उपस्थिती पाहता गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते गावात जणू भक्तीचा मळा फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले यात टाळ मृदगांचे तालावर नाचणारे वारकरी आणि हरिनामाचा गजर पाहता संत केजाजी महाराजांचे जयघोषाने घोराड नगरी दुमदुमली होती येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातून सकाळी अकरा वाजता पालखी निघाली यात विविध मंडळानी तयार केलेले आकर्षक रथ, दाखल झालेले अश्व, बँडपथक, आणि भजनी मंडळाचा सहभाग असलेला हा दिंडी सोहळा मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालत संत नामदेव महाराज समाधी स्थळावर पोहचल्यानंतर तिथे अश्वाचे रिंगण पार पडले यावेळी हातात भगव्या पताका घेत धावणारे वारकरी, विणेकरी, पकवाज वादक, डोक्यावर तुळसी वृंदावन, पारायण गाथा घेऊन सहभागी झालेल्या महिला आणि हरीपाठ मंडळाचे वतीने मानवी साखळी द्वारे उंच मनोरा करीत वाजविला जाणारा पकवाज हा सगळा डोळ्याचे पारणे फेडणारा क्षण पाहण्यासाठी मैदानावर भाविकांची मोठी गर्दी उसळली होती या पालखी सोहळ्यानिमित्त गावातील रस्त्यावर महिलांनी रांगोळ्या काढून रस्त्याची सजावट करण्यात आली होती ठिकठिकाणी स्वागत कमानी



उभारण्यात आल्या होत्या पालखी गावातील प्रमुख मार्गाने जात असताना ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात आले यात सहभागी भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी अल्पोपोहार, चहापाण्याची व्यवस्था ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती मुख्य मार्गाने दिंडी पालखी ग्रामपंचायत मार्गे दुपारी पाच वाजता मुख्य मंदिराजवळ येताच या दिंडी सोहळ्याची सांगता झाली त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले

रागीट महाविद्यालयातर्फे स्कूल कनेक्ट (NEP Connect) अभियान

रामटेक -(जयश्री मेंघरे/वैद्य):- रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक द्वारा५ शासकीय आश्रमशाळा बेलदा५ येथे स्कूल कनेक्ट (छएझ उेपपशलीं) अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. आणि आगामी शैक्षणिक सत्रात म्हणजेच २०२४-२०२५ मध्ये पदवी चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागु होणार आहेत. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणाची संकल्पना व जाणीव इयत्ता १२वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यापीठांना व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविलयांना स्कूल कनेक्ट (छएझ) अभियान राबवून समुपदेशन कार्यक्रम घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक तर्फे आदिवासी बहुल शासकीय आश्रमशाळा, बेलदा येथे नवीन शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन व कार्यशाळचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची तत्त्वे पटवून देणे, कौशल्यात्मक शिक्षण, उच्च शिक्षण घेण्यासाठी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, तसेच उद्योजक निर्माण करून त्यांना सक्षम बनविणे,इ होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक मा.श्री. सतीश छपाने प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्य मार्गदर्शक म्हणून प्रा. अमित हटवार, यांनी शैक्षणिक धोरण यावर विद्यार्थ्यांना समुपदेशन केले. प्रा. ज्ञानेश्वर नेवारे हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते यांनी. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शैक्षणिकदृष्ट्या कसे महत्त्वाचे आहे. असे पटवून दिले तर , प्रमुख अतिथी व वक्त्या प्रा. निकिता अंबादे यांनी करीयर च्या संधी व कोणते क्षेत्र उपलब्ध होऊ शकतात यावर मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री५५५ सतीस छपाने यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात कसे जाता येईल या संदर्भात प्रेरणादायी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लांजेवार मॅडम यांनी केले तर आभार प्रा. भाजीपाला मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पिपरीतील काँग्रेस कार्यकर्ते भाजपात प्रवेश

गाव चले अभियानात ; आमदार दादाराव केचे नेतृत्वावर विश्वास

कारंजा : आर्वी मतदारसंघात भाजप पक्षाचे विकासपुरुष आमदार दादाराव केचे यांच्या नेतृत्वाखाली गाव चले अभियान सुरू असताना कारंजा तालुक्यातील पिपरी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजप पक्षात प्रवेश करण्यात आला.यावेळी आमदार दादाराव केचे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. तालुक्यातील पिपरी,लिंगामांडवी गट ग्रामपंचायत मधील ग्राम पंचायत सदस्य जीवन डोबले, काँग्रेस कार्यकर्ते सोमनाथ घागरे, राहुल ढोले, विष्णू पोटे, दिलीप शेंद्रे, उमेश किनकर, मुकुंदा देवासे, अंबादास डोबले, नथ्थूजी नेहारे, सचिन मानमोडे, केदारनाथ देशमुख, पुरुषोत्तम देवासे, श्रावणजी तलांजी, विजय डोबले,विजय ढोले, अतुल कालभुत, भाऊराव डोबले,कृनाल देशमुख यांच्या सह असंख्य कार्यकर्ते भाजपात प्रवेश केला आहे. घर चलो अभियान कार्यक्रम वेळी गावागावात जाऊन घरोघरी भेटी देत असताना अनेक नागरिक भाजप पक्षात प्रवेश करत असल्याचे आमदार दादाराव केचे यांनी सांगितले. असाच आजही पिपरी येथे काँग्रेस कार्यकर्ते माझ्यावर



विश्वास ठेवत पक्ष प्रवेश केला आहे.यावेळी माजी सभापती मंगेश खवशी,जिल्हा नियोजन समिती सदस्य मुकुंद बारंगे हरिभाऊ धोटे, रोशन चौधरी, चक्रधर डोंगरे, नितीन गाखरे, राजू ढोले उपस्थित होते.

विकासाची झंझावाताना भाजपात प्रवेश

आर्वी मतदार संघातील गावाचा भूतो न भविष्य असा दिवसेंदिवस विकास होत आहे. गावखेड्यात विकासाची गंगा वाहू लागली आहे. ग्रामीण भागातील रस्ते मजबूती करण होत आहे.गावातील रस्ता सिमेंट करण केले जात आहे.गावात जलजीवन मिशन अंतर्गत घर तिथं नळ योजना सुरू आहे.यासह असंख्य कार्यक्रम सुरू असताना नागरिक भाजपात येण्यासाठी इच्छुक आहेत.त्यामुळे आम्ही नागरिकांना पक्षात प्रवेश करत असून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे काम केले जात आहे.यावेळी आमदार दादाराव केचे यांनी सांगितले.

नगरपंचायत प्रशासनाने स्वच्छतेची कामे पूर्ण करा अन्यथा उपोषण:- गटनेते विक्की बारेकर यांचा ईशारा

;प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपूर : - नगरपंचायत प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे त्रस्त झालेल्या नगरसेवक विक्की बारेकर यांनी नगरपंचायत प्रशासनाने स्वच्छतेबाबतची प्रलंबित कामे पूर्ण न केल्यास नागरिकांसह उपोषणाला बसण्याचा ईशारा प्रशासकीय अधिकारी पवन धुमाळे यांना दिलेल्या निवेदनात केला. वॉर्ड क्रमांक १४ मध्ये नगरपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे कचऱ्याची बजबजपुरी तयार झाली . अनेकवेळा नाली सफाई, वाढलेला कचरा, अस्वच्छतेमूळे होणारे आरोग्यावरील परिणाम याविषयी मागील दोन वर्षा पासून नगरसेवक श्री.बारेकर यांनी पत्र व्यवहार केला व सर्वसाधारण सभेमध्ये प्रश्न मांडले. वारंवार सूचना करून सुद्धा कोठल्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही. प्रशासन जाणीवपुर्वक वार्ड क्रमांक १४ मधील कामांकडे दुर्लक्ष करित असून नागरिकांना विनाकारण मानसिक त्रास देण्याचे काम सुरू आहे असा आरोपही श्री.बारेकर यांनी केला .प्रलंबित कामांना तात्काळ मार्गी लावावे अन्यथा प्रशासना कडून होणाऱ्या त्रासाला उत्तर म्हणून कार्यालयीन पटांगणासमोर नागरिकांसह उपोषण करण्याचा ईशारा दिला.



साऊथ ईस्ट सेंटर रेल्वेच्या डी. आर. एम. १६ फेब्रुवारी ला प्रत्यक्षात पाहणी करणार

मार्च च्या पहिल्या आठवडयात रेल्वे अंडरपास ब्रिज नवीन कामठी व ड्रॅगन पॅलेस करिता खुले होणार-ॲड. सुलेखाताई कुंभारे यांच्या प्रयत्नाला यश,

कामठी:-नंदू कोल्हे

विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस ला भेट देणा-या लोकांची संख्या वाढत असल्यामुळे तसेच नविन कामठी येथे झपाट्याने विकास होत असल्यामुळे अतिरिवत रेल्वे अंडरपास ब्रिज (ठणइ) ची मागणी सातत्याने ॲड. सुलेखाताई कुंभारे तर्फे करण्यात आली होती. त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांनी रेल्वे अधिका-यांना निर्देश दिल्या प्रमाणे रेल्वे अंउरपास ब्रिज चे काम सुरू करण्यात आले. परंतु काही तांत्रीक अडचणी मुळे हे काम रखडलेल्या गेले होते, केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांच्या निवास स्थानी दिनांक : ०७/१०/२०२३ ला रेल्वे अधिका-यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला ॲड. सुलेखाताई कुंभारे यांच्या सह साऊथ ईस्ट सेंटर रेल्वेच्या डी. आर. एम. श्रीमती नमिता त्रिपाठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता श्री. भानुसे प्रामुख्याने उपस्थित होते. धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त दिक्षाभुमी वरून लाखोंच्या संख्येनी कामठी येथील ड्रॅगन पॅलेस ला भेट देत असता. त्यामुळे हा रेल्वे अंडरपास ब्रिज (ठणइ) लोकांकरिता खुला करावा असे मत ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी बैठकीत मांडले. धम्मचक्र प्रवर्तन दिना पर्यत काम पूर्ण होऊ शकत नाही. परंतु नोव्हेंबर च्या पहिल्या आठवडयात काम पूर्ण करता येईल असे डी.आर.एम. यांनी स्पष्ट केले. परंतु काम पूर्ण न झाल्यामुळे



ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी डी. आर.एम च्या कार्यालयात जाऊन काल दि. ०९/०२/२०२४ रोजी त्यांची भेट घेतली चर्चे दरम्यान डी. आर.एम. श्रीमती नमिता त्रिपाठी यांनी शुकवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्षात कामाची पाहणी करण्यावे तसेच मार्च २०२४ च्या पहिल्या आठवडयात रेल्वे अंडरपास ब्रिज (ठणइ) लोकांकरिता खुले करण्याचे आश्वासन दिले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242